


महाराष्ट्राचे सर्वमान्य दैनिक

# समर्थ गांवकरी

POSTAL REGISTRATION NO : SRP/137/2023-2026

रविवार, दि. १४ डिसेंबर २०२५




मुंबई, अहमदनगर, पुणे, नाशिक, जळगाव, धुळे, नंदुरबार, सिंधुदुर्ग, रत्नागिरी, पालघर, सांगली, सातारा, कोल्हापूर, सोलापूर, औरंगाबाद, बीड, नांदेड, परभणी, हिंगोली, लातूर, बुलढाणा, अमरावती, अकोला, नागपूर, गडचिरोली, भंडारा, गोंदिया, यवतमाळ, वर्धा, येथून एकाच वेळी प्रकाशित होणारे दैनिक

संपादक : डॉ. विश्वासराव आनंदराव आरोटे | नोंदणी क्रमांक : MAHMAR/2021/82132 | पाने : ४ | वर्ष : ४थे | अंक : ०३० | किंमत : ४ रूपये | Gmail : aklgavakari@gmail.com Gmail : punegavkari@gmail.com




# हिवाळी अधिवेशनाचा आज शेवटचा दिवस

## हिवाळी अधिवेशन महापालिका निवडणुकांसाठीच होते:बिल्डरांचे भले आणि निवडणुकीची तरतूद, हेच सरकारचे धोरण - भास्कर जाधव

**नागपूर : (समर्थ गांवकरी)**

"नागपूर कराराप्रमाणे विदर्भाला न्याय मिळण्यासाठी हे हिवाळी अधिवेशन व्हायला हवे होते. मात्र, विदर्भाच्या पदरात काहीच पडले नाही. हे अधिवेशन कोणालाही न्याय देण्यासाठी नसून केवळ पुरवणी मागण्या मंजूर करून सरकारी पैशांची उधळपट्टी करण्यासाठी आणि त्यातून आगामी निवडणुकांसाठी मते विकत घेण्यासाठीच होते," अशा शब्दांत ठाकरे गटाचे नेते भास्कर जाधव यांनी राज्य सरकारवर सडकून टीका केली.



आज नागपुरात सुरू असलेल्या विधिमंडळाच्या हिवाळी अधिवेशनाचा शेवटचा दिवस आहे. अधिवेशनाच्या समारोपाच्या दिवशी अंतिम आठवडा प्रस्तावावर चर्चा होणार असून, यावेळी मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस विरोधकांनी केलेल्या आरोपांना आणि उपस्थित केलेल्या प्रश्नांना उत्तरे देणार आहेत. तत्पूर्वी भास्कर जाधव यांनी सरकारच्या कामकाजाचे वाभाडे काढले.

अधिवेशनाच्या सांगतेच्या वेळी बोलताना जाधव म्हणाले, "विदर्भ वेगळा होऊ नये म्हणून झालेल्या करारानुसार वर्षातून एक अधिवेशन नागपूरला होते. या अधिवेशनात विदर्भाच्या प्रश्नांना प्राधान्य देणे अपेक्षित असते. मात्र, सभागृहात ज्या घोषणा झाल्या, त्या केवळ मुंबई, ठाणे, पुणे, पिंपरी-चिंचवड आणि नागपूरसारख्या मोठ्या महानगरपालिकांत मते मिळवण्यासाठीच होत्या. बिल्डरांच्या फायद्याचे निर्णय घेण्यात आले, पण विदर्भातील सामान्य माणसाला काय मिळाले?" असा सवाल त्यांनी उपस्थित केला.

सरकारच्या कार्यपद्धतीवर प्रश्नचिन्ह उपस्थित करताना जाधव म्हणाले, "कालच सभागृहात एमपीडीए कायद्याचे १०८ क्रमांकाचे विधेयक अचानक आणले गेले. त्यात अनेक घातक तरतुदी असतानाही कोणतीही चर्चा न करता ते मंजूर करण्यात आले.

हे अधिवेशन केवळ आगामी निवडणुका जिंकण्यासाठी आणि लोकांना पैसे वाटण्यासाठीच घेतले गेले, हे माझे म्हणणे आता खरे ठरले आहे."

### विधानभवनाचे नाव 'लक्षवेधी भवन' ठेवा

लक्षवेधींना वेळच्यावेळी उत्तरे मिळाली नाही, तर राज्याच्या मुख्य सचिवांवर हक्कभंग आणावा असे अध्यक्ष महोदय म्हणाले. २०२२ पासून आपल्या विधानभवनाचे नाव लक्षवेधी भवन ठेवा, असे मी म्हणालो होतो. इतके हे लक्षवेधीचे प्रकरण बरेच पुढे गेलेले आहे. या विषयात जे बोलायचे ते बोलून झालेले आहे. परंतु, त्यातून फारशी काही सुधारणा होताना दिसत नाही. त्यामुळे त्यावर फार भाष्य करण्यात काही अर्थ नाही, असे भास्कर जाधव म्हणाले.

## थोडक्यात...

### पुणे परिसरात थंडीचा कडाका कायम

पुणे (समर्थ गांवकरी) : उत्तरेकडून वाहणाऱ्या थंड वाऱ्यांमुळे पुणे शहर आणि परिसरात थंडीची लाट अधिक तीव्र झाली असून, सकाळपासूनच हुडहुडी भरवणारा गारठा जाणवत आहे. निरभ्र आकाश, कोरडे वातावरण आणि उत्तर भारतातून येणाऱ्या थंड हवेच्या प्रवाहामुळे शहरातील अनेक भागांत किमान तापमानाचा पारा घसरला आहे. पुढील दोन दिवस हवामान स्थिर राहणार असून, त्यानंतर मात्र किंचित वाढ होण्याची शक्यता हवामानशास्त्र विभागाने वर्तविली आहे. शहर आणि परिसरात शनिवारी (ता. 13) पाषाण परिसरात सर्वात कमी 8.3 अंश सेल्सिअस तापमानाची नोंद झाली. पुणे शहराचे सरासरी किमान तापमान 8.8 अंश सेल्सिअस, तर कमाल तापमान 29 अंश सेल्सिअस इतके नोंदवले गेले. परिणामी पहाटे आणि रात्री गारठा अधिक जाणवत असून, उपनगरांमध्ये थंडीची तीव्रता तुलनेने जास्त आहे. हवामान विभागाने दिलेल्या माहितीनुसार, पुढील दोन दिवस कमाल आणि किमान तापमान स्थिर राहणार आहे. मात्र त्यानंतर पुढील दोन दिवस किमान आणि कमाल तापमानामध्ये किंचित वाढ होणार आहे.

### मराठी माणूस पंतप्रधान होईल

पुणे (समर्थ गांवकरी) : 'लोकशाहीवर विश्वास ठेवत मतदान केल्यानंतर मतदार अभिमानाने बोटावरील शाई दाखवतो. मात्र, या लोकशाहीत आत्माच उरलेला नाही. निवडणुकांवर विश्वास ठेवायचा की नाही, हा गंभीर प्रश्न सर्वांना पडला आहे,' अशा शब्दांत माजी मुख्यमंत्री पृथ्वीराज चव्हाण यांनी सरकारवर टीका केली. सामाजिक कार्यकर्ते मानव कांबळे लिखित 'जनगणमन' पुस्तक प्रकाशनप्रसंगी ते बोलत होते. महिनाभरात मराठी माणूस पंतप्रधान होईल,' असे ट्विट आपण केले होते. काँग्रेसचा पंतप्रधान होणार नाही, भाजपचाच होईल.

## धुळे-सोलापूर महामार्गातून इतर राज्यांचा विकास, महाराष्ट्राला काय?



**धुळे : (समर्थ गांवकरी)**

धुळे शहर हे मुंबई-दिल्ली राष्ट्रीय महामार्गाचा (क्र. ४८) भाग आणि धुळे-सोलापूर या दोन राष्ट्रीय महामार्गाचा (क्र. ५२) छेदनबिंदूवर आहे. यामुळे काही अपवाद वगळता धुळे शहर आणि पर्यायाने शेजारचे गुजरात व मध्यप्रदेश या राज्यांसाठी सर्वार्थाने फायद्याचा ठरलेल्या धुळे – सोलापूर या राष्ट्रीय महामार्गाचे काम अतिजलद पूर्ण करून तो पूर्ण क्षमतेने कार्यान्वित होणे गरजेचे झाले आहे.

पूर्वीचा जो दुहेरी (क्र.२११) होता तोच आता नवीन चौपदरी (क्र.५२) झाला आहे. तत्पूर्वी जवळपास ४६१ किलो मीटर लांबी असलेला धुळे-सोलापूर हा राष्ट्रीय महामार्ग धुळे, चाळीसगाव, छत्रपती संभाजीनगर (औरंगाबाद), बीड, धाराशिव (उस्मानाबाद) आणि सोलापूर या शहरांना जोडतो. या महामार्गाचे अनेक टप्प्यांमध्ये चौपदरीकरण (चार-पदरी) पूर्ण करण्यात आले आहे. चौपदरीकरण पूर्ण होऊन मोठा भाग वाहतुकीसाठी खुला झाला आहे. यामुळे थेट छत्रपती संभाजीनगरजवळ बीड बायपासवरील जड वाहतुकीचा ताण कमी झाला आहे.

सूत्रांनी दिलेल्या माहिती नुसार औट्रम घाटातील अवघड वळणे टाळण्यासाठी सुमारे ५.५ किलोमीटरचा बोगदा तसेच १५ किलोमीटरचा पर्यायी रस्ता प्रस्तावित आहे. यामुळे केवळ या एका महामार्गाच्या चौपदरीकरणामुळे प्रवासाचा वेळ मोठ्या प्रमाणात कमी झाला आहे. औरंगाबाद ते सोलापूरपर्यंतचा प्रवास वेगाने झाला तर अंदाजे तीन तासांत तो पूर्ण करणे शक्य झाले आहे. या महामार्गाने खानदेश, मराठवाडा आणि पश्चिम महाराष्ट्र हे तीन महत्त्वाचे प्रदेश जोडले गेले आहेत.यामुळे साहजिकच या भागातील उद्योग आणि व्यापार वाढीला भविष्यात अधिक चालना मिळणार आहे. यामुळे उत्तरेकडील उद्योग क्षेत्र आणि दक्षिणेकडील माहिती तंत्रज्ञान क्षेत्राला जोडणारा प्रमुखमार्ग म्हणूनही या महामार्गाची ओळख होऊ लागली आहे. छत्रपती संभाजीनगर (औरंगाबाद) येथील उद्योग-व्यवसायासाठी या महामार्गाची मोठी मदत झाली आहे. महाराष्ट्र आणि शेजारील राज्यांमधील धार्मिक आणि पर्यटन स्थळांनाही याच महामार्गाची जोडणी मिळाली आहे. धुळे शहर हे तसे राष्ट्रीय महामार्ग (क्र. ४८) म्हणजे मुंबई-दिल्ली या महामार्गाचाच एक भाग आणि राष्ट्रीय महामार्ग (क्र.५२) म्हणजे धुळे-सोलापूर या दोन प्रमुख मार्गांच्या छेदनबिंदूवर आहे. यामुळे सुरत आणि कांडला-मुंद्रा पोर्टशी जोडणीसाठी हा महामार्ग धुळ्यापासून थेट गुजरातची प्रमुख औद्योगिक शहरे (सुरत) जवळ आहेत.

## स्मार्ट शहरासाठी आवश्यक त्या सर्व सुविधा उपलब्ध करू : नितीन गडकरी



**नागपूर : (समर्थ गांवकरी)**


"गत चाळीस वर्षापासून नागपूरमधील झोपडपट्टीधारकांच्या प्रश्नांवर सातत्यपूर्ण केलेल्या प्रयत्नांमुळे आज आपण स्वमालकीच्या घरांपासून वंचित असलेल्या अनेकांना त्यांच्या नावाचे पट्टे बहाल करत आहोत. यासाठी पहिल्यांदा मी आमदार झालो, तेव्हा पट्टेवाटपाचा शासन निर्णय काढण्यात आपल्याला यश मिळाले. मुख्यमंत्री झाल्यावर याबाबत आपण धोरणात्मक निर्णय घेतला.

याच्या प्रभावी अंमलबजावणीसाठी महसूल विभाग, महानगर पालिका, नागपूर सुधार प्रन्यास यांनी परस्पर समन्वयातून केलेल्या जलद कार्यवाहीमुळे आज अनेकांनी आयुष्यभर जपलेल्या इच्छांची पूर्ती होऊ शकली", असे प्रतिपादन मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी केले. हा पॅटर्न आता राज्यभर लागू करण्यात येणार असल्याचे त्यांनी सांगितले.

## नागपूर शहराच्या विकासासोबतच संस्कृतीच्या संवर्धनाला प्राधान्य

**नागपूर : (समर्थ गांवकरी)**

वंदे मातरम् हे गीत भारताच्या क्रांतीचा मंत्र होता. याला 150 वर्षे पूर्ण होत असताना अशा प्रकाराच्या देशातील पहिल्या वंदे मातरम् उद्यानाचे लोकार्पण होत आहे. ही सर्वांसाठी अभिमानाची व गौरवाची बाब असून नागपूर शहरातील पायाभूत सुविधांच्या विकासाबरोबरच संस्कृतीच्या संवर्धनालाही सर्वोच्च प्राधान्य आहे, या उद्यानात लेझर शोसाठी आवश्यक निधी तात्काळ उपलब्ध करुन देण्यात येईल, अशी ग्वाही मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी दिली. बजोरिया भागातील एम्प्रेस मिलच्या जागेवर स्वातंत्र्याच्या अमृत महोत्सवी वर्षानिमित्त तयार करण्यात आलेल्या वंदे मातरम् उद्यानाचे लोकार्पण तसेच प्रधानमंत्री मत्स्यसंपदा योजनेंतर्गत भांडेवाडी येथे उभारण्यात येणाऱ्या अत्याधुनिक सुविधायुक्त



मासळी बाजाराचे भूमिपूजन मुख्यमंत्री फडणवीस यांच्या हस्ते झाले, त्यावेळी मार्गदर्शन करताना ते बोलत होते. यावेळी मत्स्यव्यवसाय विकास मंत्री नितेश राणे यावेळी प्रमुख पाहूणे म्हणून उपस्थित होते. कार्यक्रमास आमदार सर्वश्री प्रवीण दटके, कृष्णा खोपडे, माजी आमदार विकास कुंभारे, अनिल सोले, गिरीश व्यास, माजी महापौर दयाशंकर तिवारी, मत्स्यव्यवसाय विकास विभागाचे सचिव रामास्वामी एन., महानगर पालिका आयुक्त डॉ. अभिजीत चौधरी, अतिरिक्त आयुक्त श्रीमती वसुमना पंत, वैष्णवी बी. आदी पदाधिकारी व अधिकारी उपस्थित होते.

## देवरी तालुक्यात बिबट्याची दहशत

**गोंदिया : (समर्थ गांवकरी)**

गोंदिया जिल्ह्यात अर्जुनी मोरगाव, सडक अर्जुनी तालुक्या नंतर आता देवरी तालुक्यातील सालई अब्दुलटोला परिसरात बिबट्याचे मध्यरात्रीच्या सुमारास एका चारचाकी चालकाला दर्शन झाल्याने आणि त्यांनीच चालत्या चारचाकीतून काढलेली चित्रफिती तालुक्यात सर्वत्र प्रसारित झाल्याने परिसरातील गावकरी आणि नागरिकांमध्ये भीतीचे वातावरण पसरले आहे. सदर परिसर हा सघन जंगल आहे त्यामुळे ग्रामस्थ सतर्कतेच्या अवस्थेत आहेत. गोंदिया जिल्ह्याच्या देवरी तालुक्यातील सालई अब्दुलटोला येथे बिबट्याचे दर्शन झाल्याने गावकरी नागरिकांमध्ये भीतीचे वातावरण पसरले आहे. मागील काही दिवसांपासून परिसरात बिबट्याच्या हालचाली वाढल्याची चर्चा सुरू असतानाच, रात्री उशिरा सालई अब्दुलटोला गावाजवळून जाणाऱ्या चिचगड रोडवर बिबट्या दिसल्याची घटना घडली आहे.

## विमान प्रवासावेळी गांजा बाळगल्याने आयटीमधील तरुणावर गुन्हा दाखल

**पुणे : (समर्थ गांवकरी)**

डोमेस्टिक विमान प्रवासात बॅग चेक करत नाही, हा समज आयटी क्षेत्रात नोकरी करणाऱ्या तरुणाला महागात पडला. खराडी येथील एका आयटी कंपनीत नोकरी करणारा तरुण त्यांच्या उत्तर प्रदेश येथील मूळ गावी निघाला होता. लोहगाव विमानतळावर बॅगेची तपासणी करताना त्यात लायटर सापडले. कर्मचारी बॅगेतून लायटर काढत असताना त्याबरोबर प्लॉस्टिकच्या दोन पुड्या मिळाल्या. त्या गांजाच्या पुड्या असल्याचे आढळून आले. विमानतळ पोलिसांनी या तरुणावर गुन्हा दाखल केला आहे. अमित जियालाल प्रजापती (२८, रा. गुलमोहर सिटी, खराडी रोड,




मूळ रा. जगदीशपूर, ता. निझामाबाद, जि. आझमगड, उत्तर प्रदेश) असे गुन्हा दाखल झालेल्या तरुणाचे नाव आहे. याबाबत सुजित बालाजी कागणे (३५, रा. लोहगाव) यांनी विमानतळ पोलिस ठाण्यात फिर्याद दिली आहे. हा प्रकार विमानतळावरील बॅग चेकिंग काउंटरवर गुरुवारी (दि. ११) रात्री साडेआठच्या सुमारास घडला. पोलिसांनी दिलेल्या माहितीनुसार, अमित प्रजापती हा खराडीतील एका आयटी कंपनीत कामाला आहे. तो पुणे ते वाराणसी या इंडिगोच्या विमानाने गावी जात होता. त्याने बॅग चेक करण्यासाठी दिल्या. फिर्यादी यांनी बॅग चेक केली, तेव्हा मशीनमध्ये एका बॅगमध्ये लायटर असल्याचे लक्षात आले. त्यांनी ही बॅग रिजेक्ट केली. प्रत्यक्ष बॅग चेक करण्यासाठी दुसऱ्या ठिकाणी पाठवली. बॅगेमध्ये लायटर व प्लास्टिकच्या दोन पुड्यांमध्ये गांजा आढळून आला. त्याचे वजन केले असता तो १२ ग्रॅम असल्याचे दिसून आले.




# भाजपच्या मुलाखतीमध्ये इच्छुकांची धांदल

## अन्य पक्षांतील इच्छुकांची झाली अडचण

**पुणे : (समर्थ गांवकरी)**

महापालिकेच्या निवडणुकीत उमेदवारी मिळावी, यासाठी भाजपकडून इच्छुक असलेल्या ८०० जणांच्या मुलाखती घेण्यात आल्या. पक्षाच्या शहर कार्यालयात या मुलाखती देण्यासाठी मोठी गर्दी झाली होती. आज रविवारी (१४ डिसेंबर) देखील इच्छुकांच्या मुलाखती घेतल्या जाणार आहेत. प्रभागात आतापर्यंत केलेल्या कामांचे सादरीकरण, पक्ष वाढीसाठी आतापर्यंत घेतलेली जबाबदारी, प्रभागात असलेला जनसंपर्क तसेच पक्षाकडून उमेदवारी मिळविण्यासाठी कसे योग्य आहे, याचे दाखले देत इच्छुकांनी मुलाखती दिल्या. पहिल्यांदाच मुलाखत देणारे वरिष्ठांच्या प्रश्नांनी गोंधळले. तर काही इच्छुकांनी आत्मविश्वासाने उत्तरे देत मुलाखत घेणाऱ्या पदाधिकाऱ्यांचे लक्ष वेधून घेतले. पुण्यातील ४१ प्रभागांमधून तब्बल अडीच हजार इच्छुकांनी भाजपकडून निवडणूक लढविण्यासाठी अर्ज भरले आहेत. अर्ज भरलेल्या इच्छुकांच्या मुलाखती शनिवार आणि रविवार या दोन दिवशी पक्षाच्या कार्यालयात होणार आहेत. पक्षाचे शहराध्यक्ष धीरज घाटे, माजी राज्यमंत्री दिलीप कांबळे, महापालिका निवडणूक प्रभारी गणेश बीडकर,



माजी सभागृह नेते श्रीनाथ भिमाले यांनी मुलाखती घेतल्या. भाजपकडून निवडणूक लढविणाऱ्या इच्छुकांची संख्या मोठी असल्याने मुलाखतीचा कालावधी मर्यादित ठेवण्यात आला.

प्रत्येक इच्छुकाला अवघ्या चार ते पाच मिनिटांतच आपली बाजू मांडण्याची संधी दिली जात होती. तर जुन्या आणि अनुभवी पदाधिकाऱ्यांना या पेक्षाही कमी वेळ दिला जात होता. भाजप इच्छुकांच्या मुलाखतीनंतर राजकीय वातावरण अधिकच तापले आहे. काही इच्छुकांच्या चेहऱ्यावर उमेदवारी जवळ आल्याचा आत्मविश्वास झळकत होता, तर काही जण 'आपलं काही चुकलं तर नाही ना?' या चिंतेत होते.

# पुण्य स्मरणार्थ शोभा यात्रा उत्साहात

**नवीन नांदेड : (समर्थ गांवकरी)**

वासवी व वनिता क्लब यांच्या वतीने यांच्या ब्र.भु. वेदांत केसरी ह.भ.प. श्री रंगनाथ महाराज परभणीकर (गुरुजी)यांच्या 56 व्या पुण्यस्मरण निमित्ताने 13 डिसेंबर रोजी काढण्यात आलेल्या शोभायात्रेचे सिडकोतील मुख्य मार्गावर अनेक ठिकाणी फटाक्यांची आतषबाजी करून स्वागत करण्यात आले यावेळी 102 कलशधारी महिलासह हभप हरिहारनंद महाराज यांच्यी भव्य रथयात्रेतुन भव्य दिव्य मिरवणूक काढण्यात आली यावेळी समाजबांधव सह भाविक भक्त मोठ्या संख्येने या मिरवणुकीत सहभागी झाले होते.





महाराष्ट्र राज्यात प्रथमच सिडको नवीन नांदेड शहरात 13 ते 16 डिसेंबर दरम्यान दरम्यान दुपारी 4 ते 7 हभप रगंनाथ महाराज परभणीकर यांच्या जिवन चरित्र कथा प.पु. हरीहारानंद भारती स्वामीजी यांच्या सुमधुर वाणीतुन होणार आहे ,तर किर्तनकार साध्वी सोनाली ताई करपे चकलांबा यांच्या सुमधुर वाणीतुन काल्याचे किर्तन 16 डिसेंबर रोजी स्थळ श्री भगवान बालाजी मंदिर देवस्थान आनंदसागर सोसायटी, हडको येथे आयोजित करण्यात आला ,हा सोहळा यशस्वीतेसाठी विविध समित्यांचे गठण करण्यात आले असून 13 डिसेंबर रोजी भव्य मिरवणूक 102 कलाशाधारी महिला सह भव्य ग्रंथ व तैलचित्राची शोभायात्रा मुख्य मार्गावर आयोजित करण्यात आली आहे.

वेदांतकेसरी ब्र.भु.ह.भ.प. श्री रंगनाथ महाराज परभणीकर (गुरुजी) हे एकमेव संतपदाला पोहचलेले व्यक्तीमत्व आहे. त्यांचे जीवन चरित्र संपूर्ण समाजाला अवगत व्हावे, याबद्दल सर्व समाजात जनजागृती व्हावी व गुरुचा उपदेश सर्व समाजाला कळावा. या उदात्त हेतूने वासवी व वासवी वनिता क्लब सिडको तर्फे या सोहळ्याचे आयोजन केले आहे. 13 डिसेंबर रोजी सकाळी 11ते 2 दरम्यान वासवी पुराणांचे प्रथम सादरकर्ते प.पु. हरिहारानंद भारती स्वामीजी यांच्या सुमधुर वाणीतुन आयोजित करण्यात आली आहे, 13 डिसेंबर रोजी सिडको बालाजी मंदिर ते हडको बालाजी मंदिर दरम्यान मुख्य मार्गावर भव्य मिरवणूक आयोजित करण्यात आली आहे.

सोहळयास भाविक भक्तांची मोठ्या संख्येने उपस्थित होते. ह्या सोहळ्याची संकल्पना व मार्गदर्शक लक्ष्मण रेवणनार, समन्वय समितीचे प्रमुख नरेश रायेवार,संदीप भागवत येरावार (अध्यक्ष),बालाजी उमाकांतराव कवटीकवार (सचिव) सौ.कोमल संदीप येरावार (अध्यक्ष), सौ.सुनिता बालाजी कवटीकवार (सचिव) श्रीनिवास व्यंकटराव येरावार (कोषाध्यक्ष),सौ.सवित्ता श्रीनिवास येरावार (कोषाध्यक्ष) व सर्व कार्यकारीणी पदाधिकारी व सदस्य वासवी क्लब व वासवी वनिता क्लब सिडको नांदेड हे परिश्रम घेत आहेत.

माहूरगड पर्यटन विकास आराखड्यास अंतिम मान्यता मिळावी यासाठी

# आमदार भिमराव केराम यांचे सरकारदरबारी पाठपुरावा

**किनवट : (समर्थ गांवकरी)**

किनवट-माहूर विधानसभा मतदारसंघाचे आमदार भीमराव केराम यांनी श्री क्षेत्र माहूरगड पर्यटनस्थळाच्या समग्र विकासासाठी करण्यात आलेल्या ८२९.१३ कोटी रुपयांच्या भव्य विकास आराखड्यास अंतिम मान्यता मिळावी म्हणून राज्याच्या हिवाळी अधिवेशनामध्ये थेट राज्याचे मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस, तसेच राज्याचे मुख्य सचिव राजेश अग्रवाल यांची विशेष भेट घेऊन आवश्यक निवेदन सादर केले.

नागपूर येथील महाराष्ट्र सुदूर संवेदन अनुप्रयोग केंद्रात मा. मुख्य सचिवांच्या अध्यक्षतेखाली उच्चाधिकार समितीची अत्यंत महत्त्वपूर्ण बैठक आयोजित करण्यात आली आहे. या बैठकीत माहूरगड पर्यटन विकास आराखड्याबाबत अंतिम निर्णय होणार असल्याने, आराखड्यास



तात्काळ मंजुरी मिळावी यासाठी आमदार केराम यांनी शासनदरबारी प्रखर पाठपुरावा सुरू केला आहे. आ. भिमराव केराम यांची मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्याकडे विशेष विनंती आमदार केराम यांनी मुख्यमंत्री फडणवीस यांना प्रत्यक्ष भेटून दिलेल्या निवेदनात म्हटले आहे की, श्री क्षेत्र माहूरगड हे प्रमुख शक्तिपीठ, श्री रेणुकामातेचे स्थळ, तसेच दत्तसंप्रदायाचे जन्मस्थान असून वर्षभर लाखो भाविक येथे भेट देतात परंतु विद्यमान सुविधा वाढत्या गर्दीपुढे अपुऱ्या पडतात. जिल्हाधिकारी नांदेड यांनी सादर केलेला ८२९.१३ कोटी रुपयांचा भव्य पर्यटन विकास आराखडा शासनाने ६ मे २०२५ रोजी तत्वतः मान्य केलेला आहे. आता अंतिम मंजुरी उच्चाधिकार समितीकडून देणे अत्यावश्यक आहे. या अनुषंगाने, "मा. मुख्य सचिवांना आवश्यक त्या सूचना देऊन आराखड्यास अंतिम मान्यता मिळण्यास सहकार्य करावे," अशी विनंती त्यांनी मुख्यमंत्री फडणवीस यांना केली. शासकीय पत्रव्यवहारास गती, मुख्य सचिवांची भेट घेतली सध्या राज्याचे हिवाळी अधिवेशन सुरु असुन अधिवेशनादरम्यान आमदार केराम यांनी मुख्य सचिव राजेश अग्रवाल यांची भेट घेऊन, पर्यटक सुविधा, धार्मिक स्थळांचे संवर्धन, वाहतूक मार्ग, मूलभूत सोयीसुविधा, सुरक्षा व्यवस्थापन, रस्ते, पायाभूत सुविधा, सांस्कृतिक वारसा संवर्धन आदी सर्व मुद्द्यांवर सविस्तर चर्चा केली.

# केमिस्ट असोसिएशनच्यावतीने स्नेहल भोसलेचा सत्कार

**जामखेड : (समर्थ गांवकरी)**

जयपूर, राजस्थान येथे २ डिसेंबर ते ५ डिसेंबर २०२५ दरम्यान झालेल्या खेलो इंडिया युनिव्हर्सिटी गेम्स राष्ट्रीय मल्लखांब स्पर्धेत जामखेडच्या श्री शंभुसूर्य मर्दानी खेळ प्रशिक्षण संस्थेच्या स्नेहल भोसलेने सुवर्णपदक पटकाविल्याबद्दल जामखेड तालुका केमिस्ट असोसिएशनच्या वतीने स्नेहल भोसलेचा सत्कार करण्यात आला.




राजस्थान जयपुर याठिकाणी दिनांक २ डिसेंबर ते ५ डिसेंबर २०२५ दरम्यान झालेल्या खेलो इंडिया युनिव्हर्सिटी गेम्स राष्ट्रीय मल्लखांब स्पर्धेत जामखेडच्या श्री शंभुसूर्य मर्दानी खेळ प्रशिक्षण संस्थेच्या कु. स्नेहल दत्तात्रय भोसले हिने सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठाकडून खेळताना आपल्या बहारदार खेळाचे प्रदर्शन करत सांघिक सुवर्णपदकावर आपले नाव कोरले आहे. स्नेहलला यशस्वी करण्यासाठी संस्थेचे संस्थापक अध्यक्ष तथा मुख्य प्रशिक्षक श्री संतोष (बबलु वस्ताद) टेकाळे, सहप्रशिक्षक अमोल निमोणकर, अहिल्यानगर जिल्हा मल्लखांब संघटनेचे सर्व पदाधिकारी तसेच तांत्रिक समितीचे सर्व सदस्य यांनी मोलाचे मार्गदर्शन केले होते.

याच अनुषंगाने स्नेहल भोसलेने सुवर्णपदक पटकाविल्याबद्दल जामखेड तालुका केमिस्ट & ड्रगिस्ट असोसिएशनचे अध्यक्ष तात्यासाहेब बांदल यांच्या पत्नी सौ चित्रा तात्या बांदल यांच्या हस्ते स्नेहल भोसलेचा सत्कार करण्यात आला. प्रसंगी श्री शंभुसूर्य मर्दानी खेळ प्रशिक्षण संस्थेचे संस्थापक अध्यक्ष तथा मुख्य प्रशिक्षक श्री संतोष (बबलु वस्ताद) टेकाळे, जामखेड तालुका केमिस्ट असोसिएशनचे अध्यक्ष तात्यासाहेब बांदल, अमोल निमोणकर, अभिलाषाताई भोजने, नेहाताई म्हेत्रे, विकास आजबे, संदिप राऊत, अविनाश शिंदे, महेश नरके उपस्थित होते.

# कंधार येथील नालीत लाल कलर की रक्त

**कंधार : (समर्थ गांवकरी)**

कंधार येथे लुंगारे गल्ली ते लॉ कॉलेज जवळील नालीच्या वाहत्या पाण्यामध्ये लाल कलर दिसून आले व अनेक नागरिकांनी पाहिले हे पाणी कुठून येत आहे .परिसरात नालीचे पाणी वाहत असताना आनेक नागरिकांना चित्र दिसले आणि चर्चा सुरू झाली कलर की रक्त नाली मध्ये वाहत आहे . नागरिकांमधून एकच चर्चा सुरू झाली कलर नाही तर हे रक्त आहे. नेमकं कशाचं काही प्रकार घडले का ? लॉ कॉलेज इथे नालीच्या पाण्यामध्ये रक्त वाहताना अनेक युवकांनी पाहिले आणि मोबाईल मध्ये सेव्ह केले आहे. काही ठिकाणी बैलाची कतल होत असेल चर्चा सुरू झाली आहे याकडे प्रशासनाने पोलीस व नगरपालिकेच्या कर्मचाऱ्यांनी लक्ष देऊन सकाळी सकाळी चक्कर माराव अशी जनतेतून मागणी होत आहे.

# १० पेक्षा अधिक कर्मचारी असलेल्या आस्थापनांमध्ये 'अंतर्गत तक्रार समिती' अनिवार्य – जिल्हाधिकारी डॉ. पंकज आशिया

**अहिल्यानगर : (समर्थ गांवकरी)**

कामाच्या ठिकाणी महिलांचे लैंगिक छळापासून संरक्षण (प्रतिबंध, मनाई आणि निवारण) अधिनियम, २०१३ तसेच सर्वोच्च न्यायालयाच्या निर्देशानुसार जिल्ह्यातील दहापेक्षा अधिक अधिकारी व कर्मचारी कार्यरत असलेल्या सर्व शासकीय, निमशासकीय तसेच खासगी आस्थापनांमध्ये 'अंतर्गत तक्रार समिती' स्थापन करणे बंधनकारक आहे. या कायद्याची प्रभावी अंमलबजावणी करण्यासाठी सर्व संबंधित आस्थापनांनी तात्काळ कार्यवाही करावी, असे आवाहन जिल्हाधिकारी डॉ. पंकज आशिया यांनी केले आहे. सर्वोच्च न्यायालयाच्या आदेशानुसार, प्रत्येक कार्यालयात 'अंतर्गत तक्रार समिती' गठीत करणे अनिवार्य



असून, संबंधित कार्यालयाच्या प्रमुखाची 'नोडल अधिकारी' म्हणून नियुक्ती करण्यात यावी. तसेच सर्व कार्यालये व आस्थापनांनी आपल्या अंतर्गत समितीची अद्ययावत माहिती केंद्र शासनाच्या 'shebox.wcd.gov.in' या संकेतस्थळावर नोंदवणे आवश्यक आहे. कार्यालयाच्या दर्शनी भागात अंतर्गत समिती स्थापन केल्याबाबतचा फलक लावणे बंधनकारक असून, या फलकाचे छायाचित्र व त्याबाबतचे प्रमाणपत्र जिल्हा महिला व बालविकास अधिकारी कार्यालयाकडे सादर करावे, अशा सूचना जिल्हाधिकाऱ्यांनी दिल्या आहेत.

या कायद्यातील तरतुदींचे पालन न झाल्यास कठोर कारवाईचा इशारा प्रशासनातर्फे देण्यात आला आहे. आस्थापना प्रमुखाने किंवा मालकाने अंतर्गत समिती स्थापन न केल्यास, कायद्यातील कलम २६ अन्वये ५० हजार रुपयांपर्यंतच्या दंडाची तरतूद आहे. पहिल्या कारवाईनंतरही पुन्हा तोच प्रकार घडल्यास किंवा समिती स्थापन न केल्यास, संबंधित आस्थापनेला दुप्पट दंड आकारला जाईल, तसेच त्यांचा व्यवसाय परवाना रद्द करण्याची कारवाई करण्यात येईल.

जिल्ह्यातील शाळा, महाविद्यालये, विद्यापीठे, प्रशिक्षण केंद्रे, बँका, मॉल, दुकाने, कारखाने, रुग्णालये, नर्सिंग होम, आरोग्य संस्था, महानगरपालिका, विविध महामंडळे, करमणूक केंद्रे, क्रीडा संकुले, मेडिकल स्टोअर्स तसेच लहान – मोठे उद्योग अशा सर्व ठिकाणी हा नियम लागू राहील. ज्या आस्थापनांमध्ये १० पेक्षा अधिक अधिकारी किंवा कर्मचारी कार्यरत आहेत, त्यांनी तात्काळ समिती गठीत करून प्रशासनास सहकार्य करावे, असे स्पष्ट करण्यात आले आहे.

# स्वारातीम विद्यापीठाच्या २० डिसेंबरच्या परीक्षा पुढे ढकलल्या

## सुधारित वेळापत्रक विद्यापीठ संकेतस्थळावर जाहीर

**नांदेड जिल्हा : (समर्थ गांवकरी)**

स्वामी रामानंद तीर्थ मराठवाडा विद्यापीठाच्या हिवाळी २०२५ पदवी व पदव्युत्तर अभ्यासक्रमांच्या परीक्षा सध्या सुरू आहेत. दरम्यान, दि.२० डिसेंबर, २०२५ रोजी होणाऱ्या नगरपरिषद व नगरपंचायतच्या सार्वत्रिक निवडणुकांमुळे त्या दिवशी आयोजित करण्यात आलेल्या विविध अभ्यासक्रमांच्या परीक्षा पुढे ढकलण्यात आल्या आहेत. या पुढे ढकललेल्या परीक्षा संबंधित अभ्यासक्रमांच्या शेवटच्या दिवशी घेण्यात येणार असल्याचे विद्यापीठाच्या परीक्षा विभागाने स्पष्ट केले आहे.

सुधारित वेळापत्रकानुसार, दि. २० डिसेंबर रोजी होणाऱ्या बी.व्होक (पीएसएसडी), बी.व्होक (एमएलटी), एम.लिब (न्यू व रिव्हाइज्ड) या अभ्यासक्रमांच्या परीक्षा आता २२ डिसेंबर, २०२५ रोजी आयोजित करण्यात येणार आहेत. तसेच एल.एल.एम. प्रथम वर्ष व एम.पी.एड. द्वितीय वर्ष या अभ्यासक्रमांच्या परीक्षा २३ डिसेंबर, २०२५ रोजी होतील. बी.व्होक सीएमई, बी. व्होक बी.एफ.एस.आय., बी.एस्सी. जनरल, बी.एड. प्रथम वर्ष, बी.पी. एड. प्रथम वर्ष, एम.एड. एम.लिब व एम.पी.एड. प्रथम वर्ष या अभ्यासक्रमांच्या परीक्षा २४ डिसेंबर २०२५ रोजी पार पडणार आहेत.




एम.कॉम (जनरल), एम.कॉम (बँकिंग अँड इन्शुरन्स), एम.जे., एम.ए., एम.एस. डब्ल्यू. व एम.व्होक एफ.टी. या अभ्यासक्रमांच्या परीक्षा २६ डिसेंबर २०२५ रोजी घेण्यात येतील. याचप्रमाणे एम.एस्सी. जनरल (एनईपी), एम.एस्सी. जनरल (सीबीसीएस), एम.एस्सी. एसई (सीबीसीएस) एम.एस्सी. सीएम (सीबीसीएस), एमसीए द्वितीय वर्ष व बी.ए. एल.एल.बी./ एल.एल.बी. द्वितीय वर्ष या अभ्यासक्रमांच्या परीक्षा २७ डिसेंबर २०२५ रोजी होतील. एम.जे. (न्यू) या अभ्यासक्रमाची परीक्षा २९ डिसेंबर, तर एम.जे. (रिव्हाइज्ड) ची परीक्षा ३१ डिसेंबर, २०२५ रोजी पार पडणार आहे. तसेच बीबीए व बीबीए (एबीएम) या अभ्यासक्रमांच्या परीक्षा ३ जानेवारी, २०२६ रोजी आयोजित करण्यात आल्या आहेत.

या सुधारित वेळापत्रकाची सर्व संबंधित विद्यार्थ्यांनी व महाविद्यालयांनी नोंद घ्यावी. तसेच सविस्तर माहितीसाठी विद्यापीठाच्या अधिकृत संकेतस्थळाला भेट द्यावी, असे आवाहन परीक्षा व मूल्यमापन मंडळाचे संचालक हुशारसिंग साबळे यांनी केले आहे.



# सुशांत मस्के यांना भारत गौरव पुरस्कार

**अहिल्यानगर : (समर्थ गांवकरी)**

मानवाधिकार दिवस निमित्त छत्रपती संभाजीनगर येथे विश्व मानव अधिकार परिषदेच्या वतीने वार्षिक पारितोषिक समारंभात सामाजिक कार्यात उल्लेखनीय कामगिरी केल्याबद्दल सुशांत मस्के यांना भारत गौरव पुरस्काराने सन्मानित करण्यात आले. यानिमित्त विश्व मानवाधिकार परिषदेचे राष्ट्रीय अध्यक्ष डॉ. ए. आर. अन्सारी तसेच महाराष्ट्र प्रदेशाध्यक्ष नवेद भाई शेख व जिल्हाध्यक्ष अल्ताफ भाई पत्रकार तसेच सनाउल्ला खान, शोएब भाई शेख , कैफ भाई शेख विश्व मानवाधिकार परिषदेचे सर्व पदाधिकारी व मान्यवर यावेळी उपस्थित होते.

# बेकायदेशीर वृक्षांची कत्तल करणारे अटकेत

**जुन्नर तालुका : (समर्थ गांवकरी)**

ओतूर परिसरात अवैध लाकूड तोड आणि वाहतूक रोखण्यासाठी वनविभागाकडून सतत गस्त सुरू करून त्यात वाढ करण्यात आली आहे. गुरुवार १० डिसेंबर रोजी डुंबरवाडी ता:-जुन्नर टोल नाक्याजवळ मोठी कारवाई करण्यात आली.अवैध लाकूड तोड करून वाहतूक होत असल्याची गोपनीय माहिती वनपथकाला मिळताच तत्काळ पथक रवाना करण्यात आले.



टोल नाक्यावर संशयितरित्या जात असलेला एम.एच १६ ए. वाय ७५५४ हा ट्रक थांबवून तपासणी करण्यात आली

तपासात ट्रकमध्ये सु-बाभुळ, कडुनिंब,आंबा,शिरस व बाभूळ अशा विविध प्रजातींचे मोठ्या प्रमाणावर अवैध फोड सरपण लाकूड आढळून आले.संबंधित लाकूड वाहतुकीसाठी कोणतीही वैध कागदपत्रे या वाहन चालका कडे आढळली नसल्याने वाहना सह लाकूड जप्त करण्यात आले. या प्रकरणी ट्रक चालक सोमनाथ गणेश क्षिरसागर रा:-हाजी टाकळी,ता:- शिरूर,जि:- पुणे व वाहन मालक गोपाल दिनेश कारलीया रा:-ओतूर यांच्यावर भारतीय वनसंरक्षण अधिनियम १९२७ कलम ४१(२बी),४२ तसेच महाराष्ट्र वन नियमावली २०१४ मधील नियम ३१ अन्वये गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

या कारवाईसाठी उपवनरक्षक, जुन्नर प्रशांत खाडे व सहाय्यक वनरक्षक स्मिता राजहंस यांच्या मार्गदर्शनाखाली वनपरिक्षेत्र आधिकारी ओतूर चैतन्य कांबळे यांच्या नेतृत्वाखालील पथकाने ही मोहीम राबवली.वनपाल एस. एम. बुट्टे, वनरक्षक व्हि.ए. बेले व के.एफ. खराडे यांनी या छापेमारीत सक्रिय सहभाग नोंदवला.

वनविभागाच्या या कारवाईमुळे अवैध लाकूड तस्करांमध्ये भीतीचे वातावरण निर्माण झाले असून परिसरात वनसंपत्ती रक्षणासाठी विभाग अधिक सतर्क झाल्याचे दिसून येत आहे.

# जनता माध्यमिक विद्यालयाची गोपीनाथ गडाला भेट

**कंधार : (समर्थ गांवकरी)**

जनता माध्यमिक व उच्च माध्यमिक विद्यालय दगड सांगवी शाळेची शैक्षणिक सहल 2025 आज सकाळी जनता विद्यालयातून पहाटे चार वाजता सहलीला प्रारंभ झाला दगड सांगवी नगरीचे सरपंच प्रदीप पाटील फाजगे यांनी हिरवा झेंडा दाखवून व शुभेच्छा देऊन सहलीला मार्गस्थ केले . संस्थेचे संस्थापक बन्सीधर पाटील फाजगे सचिव नितीन पाटील फाजगे सुरेश पाटील फाजगे यांनी शुभेच्छा दिल्या. पहिले सहलीचे स्थळ परळी वैजनाथ येथे जाऊन दर्शन घेतले. तेथुन गोपीनाथ गडावर जाऊन महाराष्ट्राचे तत्कालीन उपमुख्यमंत्री ओबीसी चळवळीचे जनक मराठवाड्याचे भूषण कै. स्वर्गीय गोपीनाथरावजी मुंडे साहेब यांच्या जयंती दिनी मुहूर्तावर सहल जाऊन समाधीचे दर्शन घेतले व आदरांजली वाहिली . याप्रसंगी विद्यार्थ्यांना गोपीनाथरावजी मुंडे साहेब यांच्या बद्दल माहिती सांगण्यात आली. विद्यार्थी दशे पासूनच नेतृत्व गुण अंगी असणारे गोपीनाथरावजी मुंडे साहेब देशाचं नेतृत्व कसं उदयाला आलं व सामाजिक चळवळीमध्ये त्यांचे योगदान याबद्दल विद्यालयाचे प्राचार्य मोहन फाजगे सर यांनी इत्यंभूत माहिती विद्यार्थ्यांना सांगितली. यावेळी शाळेचे सहल विभाग प्रमुख आर.जी सूर्यवंशी सर ज्येष्ठ शिक्षक आर जी डुकरे सर सहशिक्षक मोहन खांडेकर सर श्रीराम फाजगे सर व शिक्षकेतर तर कर्मचारी शंकर गोरे व सहलीचे इयत्ता दहावी व नववीचे 28 मुली व 16 मुले असे एकूण 44 विद्यार्थी सहलीचा आनंद घेत आहेत व गोपीनाथ गडावरून सहल संभाजीनगर कडे ऐतिहासिक स्थळ पाहण्यासाठी रवाना झाली.

# जामखेड : नाफेड हमीभाव खरेदी केंद्राचा शुभारंभ; शेतकऱ्यांना दिलासा



**जामखेड : (समर्थ गांवकरी)**

कृषी उत्पन्न बाजार समिती जामखेड व महाराष्ट्र राज्य कृषी पणन मंडळ, पुणे यांच्या संयुक्त विद्यमाने नाफेड हमीभाव खरेदी केंद्राचा शुभारंभ शुक्रवारी (दि.१२ डिसेंबर २०२५) सकाळी ११ वाजता करण्यात आला. सोयाबीनसाठी जाहीर केलेल्या ₹५,३२८ प्रतिक्विंटल हमीभावामुळे शेतकऱ्यांना मोठा दिलासा मिळाला आहे.

यावेळी बोलताना सभापती पैलवान शरद कार्ले म्हणाले की,जामखेड तालुक्यातील शेतकऱ्यांना हमीभावाची खात्रीशीर सुविधा उपलब्ध करून देण्यासाठी बाजार समिती व नाफेडचे अधिकारी प्रयत्नशील आहेत.

शेतकऱ्यांनी अधिकाधिक लाभ घ्यावा, असे आवाहन कार्ले यांनी केले.

या प्रसंगी ज्येष्ठ नेते प्रा. मधुकर राळेभात, दत्तात्रय वारे,माजी सभापती डॉ. भगवान मुरूमकर, बाजार समितीचे सभापती पैलवान शरद कार्ले, उपसभापती नंदकुमार गोरे, सचिव वाहेद सय्यद, संचालक नारायण जायभाय, सुधीर राळेभात,रविंद्र हुलगुंडे, डॉ.सिताराम ससाणे, विठ्ठल चव्हाण,सतिष शिंदे,सुरेश पवार, तसेच प्रविण चोरडिया, भाजप शहरमंडल अध्यक्ष संजय काशिद, पोपट राळेभात, अंकुश ढवळे, गोरख घनवट,नगरसेवक अमित चिंतामणी, दिगंबर चव्हाण, डॉ ज्ञानेश्वर झेंडे,पवन राळेभात, युवा नेते बाजीराव गोपाळघरे, अ‍ॅड. प्रविण सानप, पिंटूशेठ बोरा, शिवाजी डोंगरे, दादा अंदूरे, प्रविण होळकर, डॉ. विठ्ठल राळेभात, उध्दव हुलगुंडे, सुनील यादव आदी मान्यवर, व्यापारी व शेतकरी मोठ्या संख्येने उपस्थित होते. शेतकरी पुत्र सभापती पै.शरद कार्ले, उपसभापती नंदकुमार गोरे तसेच संचालक मंडळ यांचे धोरण नेहमीच शेतकऱ्यांच्या हितासाठी असून विविध सामाजिक उपक्रम राबवत आहेत.

## ऑनलाईन नोंदणीसाठी आवश्यक कागदपत्रे

आधार कार्ड व ७/१२ उताऱ्यातील ई-पिक माहिती नोंदलेली असणे,आधारशी लिंक मोबाईल नंबर,शेतकऱ्याच्या नावाचे बँक खाते/पासबुक,नोंदणीसाठी शेतकरी स्वतः हजर फिंगरप्रिंट(थम्)किंवा ओटीपी द्यावा लागेल.न दिल्यास नोंदणी होणार नाही.फार्मर आयडी लिंक आधार कार्ड व मोबाईल नंबर शासनाने ठरवलेल्या निकषांनुसार एफ.ए.क्यू. दर्जाचे सोयाबीनच खरेदी केंद्रावर स्विकारले जाणार आहे. सदरचे ठिकाण हे कृषी उत्पन्न बाजार समिती, कार्यालय पाठीमागे (गोडावून) मधिल सेल हॉल मध्ये आसणार आहे.

# दिव्यांगाच्या "प्रहार" ने जिल्हा प्रशासन हादरले

## आमदार निधी खर्च होत नसल्याने दिव्यांगांची जिल्हाधिकारी कार्यालयावर धडक

**नाशिक : (समर्थ गांवकरी)**

प्रहार दिव्यांग संघटनेचे अध्यक्ष तथा माजी मंत्री ना. बच्चु कडू यांच्या मार्गदर्शनाखाली १२ डीसेंबर ला आमदारांना देण्यात आलेला राखीव दिव्यांग निधी खर्च होत नसल्याने जिल्ह्यातील दिव्यांगांनी जिल्हाधिकारी कार्यालयावर धडक दिली प्रहार दिव्यांग संघटनेचे जिल्हाध्यक्ष ललित पवार यांच्या नेतृत्वाखाली हे आंदोलन करण्यात आले, २०१५ च्या शासननिर्णय नुसार प्रत्येक आमदारांना मतदार संघातील दिव्यांगांच्या कल्याणासाठी ३० लक्ष निधी वितरित केला जातो, परंतु जिल्ह्यातील एकही आमदाराने दिव्यांग विकास निधी खर्च न केल्याने दिव्यांगांनी आक्रमक पवित्रा धारण करून जिल्हाधिकारी कार्यालय प्रवेशद्वार येथे धरणे आंदोलन करण्यात आल्याची माहिती जिल्हाध्यक्ष ललित पवार यांनी दिली तसेच दिव्यांगांना दरमहा देण्यात येणाऱ्या अनुदानामध्ये बच्चु कडू यांनी केलेल्या अनुदानात वाढ करण्यात आली व शासननिर्णय ही पारीत करण्यात आला परंतु प्रशासनाच्या अनागोंदी कारभारामुळे अद्यापही अनेक दिव्यांगांना २५०० ऐवजी १५०० रुपयेच अनुदान मिळत असल्याने जिल्हा प्रशासनाला धारेवर धरण्यात आले, सकाळी अकरा वाजता सुरू करण्यात आलेले आंदोलन जिल्हा प्रशासनाच्या आडमुठेपणा मुळे संध्याकाळी पाच वाजेपर्यंत चालले, जिल्हाधिकारी कार्यालयात लिफ्ट ची सुविधा नसल्याने दिव्यांगांनी आंदोलन स्थळी येऊन निवेदन स्वीकारण्याची विनंती केली, दिव्यांग आंदोलकांची संख्या वाढल्याने सुरक्षेच्या कारणास्तव जिल्हाधिकारी प्रवेशद्वार पोलिस प्रशासनाने बंद केले, प्रहार जनशक्ती पक्षाचे जिल्हा प्रमुख गणेश निंबाळकर, अनिल भडांगे यांनी आंदोलनाची धुरा सांभाळत जिल्हा प्रशासनाला धारेवर धरले, अखेर जिल्हाधिकारी कार्यालयाने नमती भुमिका घेतली व उपजिल्हाधिकारी कुंदन हिरे यांनी आंदोलनास्थळी येत निवेदन स्वीकारले, व जिल्हाधिकारी यांच्या आदेशानुसार १६ डीसेंबर रोजी दिव्यांगाच्या विविध मागण्या संदर्भात बैठक आयोजित करण्यात आल्याचे लेखी आश्वासन दिल्यानंतर साडेपाच वाजता आंदोलन मागे घेण्यात आले या प्रसंगी जिल्हाध्यक्ष ललित पवार, जिल्हाध्यक्ष रवींद्र टीळे, कार्याध्यक्ष बबलु मिर्झा* संतोष मानकर,, प्रभाकर धनगे,, हिम्मत माळी,, निलेश क्षिरसागर,, नितिन गव्हाणे,, भरत राऊत,, माधव शिरसाट,, नरेंद्र महाजन,, दत्ता लोंढे,, भाऊसाहेब सांगळे,, दत्तु जाधव,, रुपेश परदेशी,,विलास कानकट,, सोमनाथ खुरसने,, दत्ता कांगणे, सुभाष निकाळजे,, सहीत शेकडो दिव्यांग उपस्थित होते.




अहिल्यानगर–बीड–परळी वैजनाथ नवीन रेल्वे मार्ग प्रकल्पाच्या बीड–वडवणी विभागाची

# सीआरएस तपासणी यशस्वीरित्या पूर्ण



**अहिल्यानगर : (समर्थ गांवकरी)**

अहिल्यानगर-बीड–परळी वैजनाथ नवीन ब्रॉडगेज रेल्वे मार्ग प्रकल्पाच्या (२६१ किमी) बीड–वडवणी विभागाची (३१.७३५ किमी) वैधानिक तपासणी यशस्वीरित्या पूर्ण केली, त्यानंतर १३२ किमी प्रतितास वेगापर्यंत चाचणी घेण्यात आली. सदरील तपासणी मराठवाडा विभागातील रेल्वे कनेक्टिव्हिटी मजबूत करण्याच्या उद्देशाने असलेल्या या महत्त्वपूर्ण रेल्वे प्रकल्पाच्या प्रगतीमधील एक महत्त्वाचा टप्पा आहे.

यापूर्वी, अहिल्यानगर–बीड विभागावर (१६८ किमी) रेल्वे सेवा आधीच सुरू झाली आहे, आणि नव्याने तपासणी झालेल्या बीड–वडवणी विभागासाठी लवकरच परवानगी मिळण्याची अपेक्षा आहे, ज्यामुळे परळी वैजनाथच्या दिशेने पुढील कार्यान्वयनाचा मार्ग मोकळा होईल.

## M|O|C कॅन्सर केअर सेंटरद्वारे आयोजित ONCO 3Sixty २०२५ या राष्ट्रीय ऑन्कोलॉजी परिषदेचे उद्‌घाटन

**पुणे : (समर्थ गांवकरी)**



M|O|C कॅन्सर केअर अँड रिसर्च सेंटरने वेस्टिन, पुणे येथे १२-१४ डिसेंबर दरम्यान आयोजित करण्यात आलेल्या ONCO 3Sixty २०२५ या आपल्या पहिल्याच प्रमुख राष्ट्रीय ऑन्कोलॉजी परिषदेचे उद्‌घाटन केले. ही तीन दिवसीय परिषद भारताचा सर्वाधिक प्रभावशाली वैज्ञानिक मंच बनू पाहत आहे, जिथे देशभरातील अग्रगण्य चिकित्सक, संशोधक व इनोव्हेटर्स एकत्र जमणार आहेत. उच्च स्तरीय संवाद, अर्थपूर्ण बातचित व अत्यंत आधुनिक ज्ञानाची देवाणघेवाण यांना चालना देण्याच्या हेतूने आखण्यात आलेल्या या कार्यक्रमामध्ये भारतातील कर्करोगाच्या देखभालीच्या भविष्यावर प्रभाव टाकू शकेल, अशा चर्चा आकारास येत आहेत.

ONCO 3Sixty २०२५ मध्ये २०२२ हून अधिक राष्ट्रीय स्तरावरील, कर्करोगाच्या विविध अभ्यासशाखांमध्ये कार्यरत असलेल्या ऑन्कोलॉजिस्ट्सना पाहुणे म्हणून बोलावण्यात आले आहे व या परिषदेत रुग्णांच्या उदाहरणांवरील संवादात्मक चर्चा तसेच परखड वैज्ञानिक वादविवादांचा समावेश असणार आहे. जागतिक प्रतिनिधीत्वाची बाजू अधिक प्रबळ करत या परिषदेमध्ये आठ प्रतिथयश ऑन्कोलॉजी लीडर्सचे स्वागत करण्यात आले, ज्यांच्या उपस्थितीमुळे वैज्ञानिक चर्चांना अधिक खोली व जागतिक दृष्टिकोन मिळत आहे. प्रिसिशन ऑन्कोलॉजी, टार्गेटेड थेरपीज, मॉलेक्युलर ऑन्कोलॉजी, थोरॅसिक ऑन्कोलॉजी आणि प्रगत उपचारात्मक धोरणे या विषयांतील त्यांचे तज्ज्ञत्व चिकित्सकांना या क्षेत्रात जागतिक स्तरावर होणाऱ्या सुधारणांचा मागोवा घेण्यास तसेच या नव्या संकल्पना भारतीय संदर्भात प्रभावीपणे कशाप्रकारे वापरता येतील हे समजून घेण्यास मदत करत आहे.

## एकाच कुटुंबातील तिन बालक भाजले

**नांदेड : (समर्थ गांवकरी)**

गोपाळचावडी परिसरातील एकाच कुटुंबातील अल्पवयीन तिन बालके दि ११ डिसेंबर रोजी वार गुरुवार गोपाळचावडी येथे २ सखे भाऊ शिवम एकनाथ पवार वय १० वर्षे व शिककुमार एकनाथ पवार वय १२ वर्षे व चुलत भाऊ विठ्ठल गजानन पवार वय १२ वर्षे हे तिघे जने दि ११ डिसेंबर रोजी पतंग उडवत असताना विजेच्या तारांना त्यांचा पतंग अडकला असता त्यातून त्याच्या अंगावर विजेचे थिंलगे अंगावर पडून तिघे पन त्यात भाजले गेले व ते जखमी झाले असता त्यांना विष्णुपुरी येथिल शासकीय रुग्णालयात पुढील उपचारासाठी दाखल केले आहे. सध्या प्रकृती स्थिर आहे मात्र शिवकुमार एकनाथ पवार हे ७० % भाजल्या मुळे तो सध्या आस्वस्थ आहे व त्या तिघांवर उपचार सुरू आहे.

# कोळी समाज बांधवांचा विधान भवनावर धडक मोर्चा

- महसुल मंत्र्यांनी लवकरच प्रश्न सोडविण्याचे दिले आश्वासन

**रावेर : (समर्थ गांवकरी)**

संपूर्ण महाराष्ट्रभरातुन नागपुर हिवाळी अधिवेशनावर अनायग्रस्त आदिवासी ढोर कोळी, मल्हार कोळी , महादेव कोळी , टोकरे कोळी जमातीचा जात प्रमाणपत्र व वैधता प्रमाणपत्राचा प्रश्न कायमचा व सरसकट मिळविण्या संदर्भात ।जमातीचे नेते श्री दत्ताभाऊ सुरवसे यांच्या नेतृत्वात दि. १० /१२ / २५ रोजी विधानभवनावर समस्त अन्यायग्रस्त कोळी जमातीचा भव्य मोर्चा काढण्यात आला होता . अनुषंगाने जळगाव जिल्हाअध्यक्ष हरलाल भाऊ कोळी यांच्या नेतृत्वात जिल्हाभारातुन असंख्य कोळी समाज बांधव आंदोलनात सहभागी झाले होते . आदिवासी कोळी समाज जळगाव जिल्हाच्या तसेच पक्षाच्या वतीने अनु. जमाती जिल्हाध्यक्ष हरीलाल भाऊ कोळी व रावेर विधानसभेचे कार्यसम्राट आमदार अमोल भाऊ जावळे यांच्या मार्गदर्शनाखाली व पुढाकाराने तसेच मध्यस्तीने महसुल मंत्री मा ना चंद्रशेखर बावनकुळे साहेब यांच्याशी चर्चा करून त्यांच्याकडे मागण्यांचे निवदेन देण्यात आले . त्यावर मा. आ. अमोल भाऊ जावळे यांनी संपूर्ण आदिवासी कोळी समाजावर होत असलेल्या अन्याय बाबत सविस्तर माहिती देवून त्यांनी सकारात्मक सहमती दर्शवून तत्काळ राज्यातील सर्व जिल्हाधिकारी यांना माहिती मागवून योग्य तो निर्णय घेण्यात येईल असे सकारात्मक सहमती दर्शविली. या आंदोलनाला लवकर यश येईल असे भाकीत त्यांच्या चर्चवरून कोळी समाज बांधवांना वाटु लागले आहेत . मा आ . अमोल भाऊ जावळे यांनीही मी आदिवासी कोळी समाजाच्या प्रश्न सुटावा म्हणून पुर्ण पाठपुरावा करेल असे त्यांनी आश्वासित केले . त्यावेळी त्यांच्या सोबत सेवानिवृत्त ग्रामविकास अधिकारी संतोष अप्पा सपकाळे , आदिवासी कोळी महासंघाचे जिल्हासचिव मनोहर कोळी , तालुकाध्यक्ष योगेश्वर कोळी , दत्तात्रय उन्हाळे गुरुजी , सागर खवले , आ. अमोल भाऊ यांचे स्वीय सहाय्यक चेतन चौधरी, श्रीकांत भाऊ यांनी चर्चत सहभाग नोंदविला.




## कृषि अधिकाऱ्यांसाठी शेतकरी शेतीशाळा प्रशिक्षकांचे प्रशिक्षण संपन्न

**अहिल्यानगर : (समर्थ गांवकरी)**




श्री मारुतराव घुले पाटील शिक्षण संस्था ,कृषि विज्ञान केंद्र, दहीगाव (ने.) येथे अहिल्यानगर जिल्ह्यातील शेती क्षेत्रातील नवनवीन तंत्रज्ञाणाचा प्रसार करण्यासाठी क्रॉपसॅप अंतर्गत निवडलेले कृषि अधिकाऱ्यांसाठी शेतकरी शेतीशाळा प्रशिक्षकांचे प्रशिक्षण कार्यक्रम ८ ते १२ डिसेंबर २०२५ या कालावधीत आयोजन करण्यात आले.

या प्रशिक्षणा दरम्यान डॉ. श्यामसुंदर कौशिक, प्रमुख आणि वरिष्ठ शास्त्रज्ञ, कृषि विज्ञान केंद्र, दहीगाव ने, सुधाकर बोराळे, जिल्हा अधिक्षक कृषि अधिकारी, अहिल्यानगर तसेच अमोल काळे, तंत्र अधिकारी, उपविभागीय कृषि अधिकारी कार्यालय श्रीरामपूर यांनी मार्गदर्शन केले.

कृषि क्षेत्रातील नवनवीन तंत्रज्ञान व पद्धती, एकीकृत कीड-रोग व्यवस्थापन, हवामान आधारित सल्ला, पीक निरीक्षण तंत्र, तसेच शेतकरी शेती शाळा प्रभावीपणे कशी राबवावी याबाबत माणिक लाखे, केव्हीके शास्त्रज्ञ-पिक संरक्षण, धनंजय हिरवे तालुका कृषि अधिकारी नेवासा, निलेश बिबवे, सुखदेव जमदाडे, केव्हीके शास्त्रज्ञ सचिन बडधे, प्रकाश बहिरट, व इतर तज्ञांनी सखोल मार्गदर्शन केले.

अहिल्यानगर जिल्ह्यातील ७ तालुक्यांमधून (नेवासा, शेवगाव, पाथर्डी, कर्जत, जामखेड, श्रीगोंदा व नगर) निवडलेले कृषि अधिकाऱ्यांनी या प्रशिक्षण कार्यक्रमा मध्ये सक्रिय सहभाग नोंदवला. प्रशिक्षण मध्ये विधी प्रात्यक्षिके, क्षेत्रभेटी, समूहचर्चा आणि आधुनिक कृषि तंत्रज्ञानावरील व्याख्यातांचे व्याख्यान आयोजित करण्यात आले. या दरम्यान प्रशिक्षणार्थ्यांकडून विविध उपक्रम, लघु प्रयोग, प्रात्यक्षिके ,विविध प्रयोग करून घेण्यात आले.

कार्यक्रमादरम्यान निवडलेले कृषि अधिकाऱ्यांनी मनोगत व्यक्त करतांना सांगितले की, क्रॉपसॅपच्या मदतीने पीक संरक्षण व उत्पादन व्यवस्थापन अधिक शास्त्रीय पद्धतीने करता येते.

या प्रशिक्षणामुळे प्रशिक्षकांना त्यांच्या तालुक्यात शेतकरी शाळा प्रभावीपणे राबविण्यासाठी महत्त्वपूर्ण दिशा मिळणार आहे. या पाच दिवसीय प्रशिक्षण कार्यक्रमाला सहभागी आणि आयोजकांनी उत्स्फूर्त प्रतिसाद दिला असून कृषि विज्ञान केंद्र, दहीगाव (ने.) द्वारे जिल्ह्यातील कृषि विकासाला एक महत्त्वपूर्ण चालना मिळणार आहे.

या कार्यक्रमामध्ये केव्हीके चे शास्त्रज्ञ नारायण निबे, नंदकिशोर दहातोंडे, डॉ. चंद्रशेखर गवळी, प्रकाश हिंगे व कृषि विज्ञान केंद्राचे सर्व शास्त्रज्ञ व कर्मचारी अंकुश जोगदंड, तालुका कृषि अधिकारी शेवगाव, निलेश भागवत, सुर्यकांत काकडे, तसेच इतर मान्यवर हजर होते. आभार इंजी. राहुल पाटील यांनी केले.

## नगरमधील वेश्याव्यवसायाचा पर्दाफाश

**अहिल्यानगर : (समर्थ गांवकरी)**

मसाजच्या नावाखाली वेश्या व्यवसाय चालवणाऱ्या 'अँक्यूम मसाज' पार्लरवर अनैतिक मानवी वाहतूक व व्यापार प्रतिबंधक कक्षाच्या पोलिसांनी छापा टाकला. कारवाईत ५ पीडित महिलांची सुटका करण्यात आली आहे. स्पा मॅनेजर अनिकेत अशोक बचाटे आणि ग्राहक महेश सुंदराणी यांना ताब्यात घेतले. सदरील कारवाई नगर-मनमाड रस्त्यालगत असलेल्या 'अँक्यूम मसाज पार्लरवर ११ डिसेंबर रोजी दुपारी करण्यात आली. अनैतिक मानवी वाहतूक व व्यापार प्रतिबंधक कक्षाच्या पोलीस निरीक्षक पोलीस निरीक्षक रवींद्र देशमुखयांना या स्पामध्ये मसाजच्या आडून बेकायदेशीर वेश्या व्यवसाय सुरू असल्याची गोपनीय माहिती मिळाली होती.

# तांदलवाडी येथे फॅमिली हेल्थ कार्डचे वाटप

## सरपंच सौ सुरेखा तायडे यांचा स्तुत्य उपक्रम



**रावेर : (समर्थ गांवकरी)**

रावेर तालुक्यातील तांदलवाडी येथील मराठी मुलींची शाळे मध्ये दिनांक १२/१२/२०२५ वार शुक्रवार रोजी छत्रपती शाहू महाराज संस्थे च्या मार्फत फॅमिली हेल्थ कार्डाचे वितरण करण्यात आले.

या प्रसंगी तांदलवाडी येथील सरपंच सौ. सुरेखा सिद्धार्थ तायडे या मुख्य अतिथी म्हणून उपस्थित होत्या. सोबत महाएकता फाउंडेशन तांदलवाडी चे अध्यक्ष योगेश्वर कोळी , सामाजिक कार्यकर्ते सिद्धार्थ तायडे सर , अतुल चौधरी , सैय्यद आरिफ , भागवत तायडे , यांच्या सह लाभार्थी ग्रामस्थ उपस्थित होते या वाटप केलेल्या कार्ड मुळे गावातील शेतकरी, मजूरवर्ग, गरीब,गरजू नागरिकांना फॅमिली हेल्थ कार्डमुळे खासगी हॉस्पिटलमध्ये उपचारांमध्ये लागणाऱ्या बिलांमध्ये कमीत कमी २०% ते जास्तीत जास्त ५०% टक्क्यांपर्यंत सूट मिळणार आहे. यात ओपीडी, आईपीडी, ऑपरेशन, एक्स-रे, सोनोग्राफी, रक्त तपासणी, अति दक्षता, बालरोग तज्ज्ञ, स्त्रि-रोग तज्ज्ञ, दंत रोग तज्ज्ञ, नेत्र विकार तज्ज्ञ, आदींना समाविष्ट करण्यात आले आहे. फॅमिली हेल्थ कार्डचे सभासद नोंदणी शिबिर नुकतेच तांदलवाडी येथे घेण्यात आले. या शिबिरास उत्तम प्रतिसाद लाभला. या प्रसंगी छत्रपती शाहू महाराज संस्थेचे प्रकल्प अधिकारी आकाश एस. आरके, क्षेत्र अधिकारी सौ. सविता एस. पाटील, सहाय्यक प्रकल्प अधिकारी सौ. मनीषा के. साळवी उपस्थित होते.

## अर्धापूरात 'नवोदय' परिक्षा शांततेत पार



**अर्धापूर : (समर्थ गांवकरी)**

तालुक्यातील विविध शाळेतील इयत्ता पाचवी वर्गातील विद्यार्थ्यांनी पुढील शैक्षणिक वर्षाची इयत्ता सहावीसाठीची पीएम श्री नवोदय विद्यालय प्रवेश परीक्षा शनिवारी दि.१३ रोजी सुरळीत पार पडली. अर्धापूर शहरातील दोन परीक्षा केंद्रात इयत्ता पाचवीच्या ५६३ विद्यार्थ्यांनी ही प्रवेश परीक्षा दिली. भारत सरकारच्या शिक्षण मंत्रालयाच्यावतीने पीएम श्री नवोदय विद्यालय चालविले जाते. येथे निवड झालेल्या विद्यार्थ्यांची राहण्याची, जेवणाची व शिक्षणाची पूर्ण मोफत सुविधा उपलब्ध करून दिली जाते. सहावीसाठी हा प्रवेश दिला जातो. त्यासाठी इयत्ता पाचवीचे विद्यार्थी प्रवेश परीक्षा देतात. यावर्षी अर्धापुर तालुक्यातील ५८२ विद्यार्थ्यांनी प्रवेश परीक्षेसाठी अर्ज केले होते. परीक्षेसाठी विद्यार्थ्यांचा चांगला प्रतिसाद मिळाला. ५६३ विद्यार्थी उपस्थित होते. तर १९ जणांची अनुपस्थिती होती. शहरातील दोन्ही केंद्रांवर ही परीक्षा शांततेत आणि सुरळीत वातावरणात पार पडली. गटशिक्षणाधिकारी लोकदाजी गोडबोले यांनी विविध केंद्रात जाऊन परीक्षा प्रक्रियेची पाहणी केली. मुदखेड तालुक्यातील ३३ शिक्षकांनी पर्यवेक्षक म्हणून कामकाज पाहिले.

# पूर्वजांविषयी आदर वाढून जीवनाला पुढील दिशा मिळेल

## दिल्लीत शिवकालीन शस्त्रे व वंदे मातरम् प्रदर्शनीचे सांस्कृतिक मंत्री कपिल मिश्रा यांच्या हस्ते उद्‌घाटन !

**नवी दिल्ली : (समर्थ गांवकरी)**



दिल्लीतील 'भारत मंडपम्' येथे 'सेव्ह कल्चर सेव्ह भारत फाउंडेशन' प्रस्तुत आणि 'सनातन संस्था' आयोजित भव्य 'सनातन राष्ट्र शंखनाद महोत्सवा' तील 'स्वराजाचा शौर्यनाद' या प्रदर्शन लावण्यात आले आहे.

या प्रदर्शनाला स्वामी दीपांकर यांनी भेट दिल्यानंतर प्रभावित होऊन स्वामीजी म्हणाले की, ही शस्त्र प्रदर्शनी पाहून अंगावर रोमांच उभे राहिले.

ही शस्त्रप्रदर्शनी पाहून आपल्याला आपल्या पूर्वजांविषयी सार्थ अभिमान वाटेल. तसेच जीवनाला पुढील दिशा मिळेल, असे मला ठाम वाटते. ही प्रदर्शनी पाहण्यासाठी तुम्ही अवश्य या, असे आवाहनही स्वामी दीपांकर यांनी या वेळी केले.

यावेळी प्रदर्शनीचे उद्‌घाटन करतांना दिल्लीचे सांस्कृतिक मंत्री श्री. कपिल मिश्रा म्हणाले, 'दिल्लीच्या इतिहासात मोगलांचे मोठे योगदान असल्याचे सतत बोलले जाते; मात्र मोगलांचे योगदान जिऱ्याएवढेच होते. त्या तुलनेत मराठे, शीख, जाट यांचे मोठे योगदान होते. त्यांचा मोठा इतिहास आहे. मराठ्यांची परवानगी घेऊनच मोगल दिल्लीच्या लाल किल्ल्यातून एक पाऊल बाहेर टाकत असत. हा खरा इतिहास आहे. इंग्रजांना दिल्ली घेतली, तर मोगलांकडून नव्हे, तर मराठ्यांकडून घेतली; मात्र जाणीवपूर्वक अनेक वर्षे खरा इतिहास लपवला गेला आहे.

या शिवकालीन शस्त्रांचे संग्राहक श्री. राकेश धावडे यांनी, शिवकालीन शस्त्रांचे संग्रहालय देशात कुठेच नाही, तर यासाठी कायमस्वरूपी संग्रहालय उभारण्याची विनंती श्री. मिश्रा यांच्याकडे केली असता, मंत्री महोदयांनी त्वरीत 'दिल्लीच्या मधोमध भारतीय शस्त्र परंपरा आणि पारंपरिक शस्त्रे यांचे भव्य संग्रहालय उभारू', असे आश्वासन दिले.

'वन्दे मातरम्' या राष्ट्रजागृतीच्या पवित्र स्तोत्राला यंदा १५० वर्षे पूर्ण होत आहेत. या ऐतिहासिक प्रसंगी स्वातंत्र्यलढ्यातील प्रेरक स्मृती, त्याग, राष्ट्रासाठीचे समर्पण आणि असंख्य क्रांतिकारकांच्या हृदयातील उर्जा जागवणारे प्रदर्शन लावण्यात आले आहे. यात 'वन्दे मातरम्'चा उगम, संघर्षगाथा व राष्ट्रउभारणीतली भूमिका मांडण्यात आली.

यावेळी लेखिका सौ. शेफाली वैद्य, सनातन संस्थेचे संस्थापक सच्चिदानंद परब्रह्म डॉ. आठवले यांच्या आध्यात्मिक उत्तराधिकारीणी श्रीसत्‌शक्ति (सौ.) बिंदा सिंगबाळ आणि श्रीचित्‌शक्ति (सौ.) अंजली गाडगीळ, 'सेव्ह कल्चर सेव्ह भारत फाउंडेशन' चे अध्यक्ष आणि भारताचे माजी माहिती आयुक्त श्री. उदय माहूरकर आदी मान्यवर उपस्थित होते.

भारत मंडपम्च्या प्रांगणातील हॉल क्र. १२ मध्ये लावण्यात आलेल्या ऐतिहासिक शस्त्रप्रदर्शन पहायला समस्त दिल्लीकरांनी आवर्जून यावे, असे आवाहन सनातन संस्थेच्या वतीने या वेळी करण्यात आले.

# अनधिकृत वक्फ नोंदीमागील अधिकाऱ्यांवर कारवाई करा

- देगलूर शहरातील वक्फ नोंद प्रकरण- आ. जितेश अंतापूरकर यांची आग्रही मागणी



**देगलूर : (समर्थ गांवकरी)**

देगलूर शहरातील तब्बल ४२१ एकर जमिनीवर महसूल विभागातील कांही अधिकाऱ्यांनी अनधिकृतपणे वक्फ बोर्डाची नोंद घेतल्याच्या मुद्द्यावर आ. जितेश अंतापूरकर यांनी विधानसभेत तीव्र आक्षेप नोंदवत, संबंधित अधिकाऱ्यांवर कठोर कारवाईची मागणी केली आहे. सदर नोंदीमुळे शहरातील हजारो घरमालक, प्लॉटधारक आणि शेतकऱ्यांना मोठ्या अडचणीत सामोरे जावे लागत आहे.सध्या नागपूर येथील अधिवेशनात आपल्या मतदारसंघातील लोकांचा जिव्हाळ्याचा प्रश्न उपस्थित करताना आ. अंतापूरकर यांनी सांगितले की, तत्कालीन उपजिल्हाधिकारी आणि त्यांच्या मार्गदर्शनाखालील कर्मचाऱ्यांनी मूळ भोगवटादार 'एक' मधून भोगवटादार 'दोन' मध्ये फेरफार करून चुकीच्या पद्धतीने वक्फ नोंदीची अमलबजावणी केली आहे. या मनमानी आदेशांमुळे अनेक कुटुंबांचे सातबारा उतारे अचानक बदलले असून नागरिक त्रस्त झाले आहेत. शहरातील ३८ गट क्रमांकांच्या सातबारावर वक्फ प्रतिबंधित सत्ता प्रकाराची नोंद झाल्याचे कळाल्यानंतर नागरिकांनी तलाठी कार्यालयात मोठ्या प्रमाणात आक्षेप नोंदविले आहेत. ५०–६० वर्षांपासून शेती, घरे, दुकाने व प्लॉटधारक म्हणून राहत असलेल्या नागरिकांना पूर्वकल्पना न देता झालेल्या या नोंदीमुळे संतापाची लाट उसळली आहे.या प्रकरणाच्या संदर्भात २००७ मध्ये ए.टी.ए. के. शेख यांच्या एक-सदस्यीय समितीने केलेल्या चौकशीचा दाखला देत महसूल विभागाने २०१५ मध्ये वक्फ मालमत्ता असेल तर सातबारावर प्रतिबंधित सत्ता प्रकारात नोंद घेण्याचे आदेश दिले होते.मात्र देगलूर शहरातील ३८ गटातील एकूण ४२१ एकर जमीन ही वक्फ बोर्डात येत नसून तत्कालीन अधिकाऱ्यांनी केवळ शहरवासी यांना त्रास देण्यासाठीच त्यांच्या सातबारावर वक्फ बोर्डाची नोंद केली आहे. त्यामुळे शहरातील हजारो घरमालक, प्लॉट धारक, दुकानदार तसेच गोर गरीब जनतेला कोणत्याही खरेदी विक्रीचा व्यवहार करता येत नसल्यामुळे आर्थिक फटका बसले आहे.

चुकीच्या पद्धतीने सातबारावर करण्यात आलेल्या नोंदीची ठोस तपासणी करून अशा प्रकारची नोंद घेणाऱ्या तत्कालीन अधिकाऱ्याविरुद्ध कठोर कारवाई करण्यात यावी.



ठाणे : दिवा शहरातील मुंब्रादेवी कॉलनी, सेंटमेरी शाळेमागील सिमेंट रस्ता गेला चोरीला, नक्की कोणी केला रस्ता हडप असे आक्रमक होत समाजसेवक अमोल केंद्रे यांनी ठाणे पालिका प्रशासनाचा निषेध व्यक्त केला आहे. पालिका प्रशासनाने बनवलेला सिमेंटचा रस्ता चक्क दीड फूट जमिनीखाली गेल्याचे निदर्शनास आल्याचे उघड करत निषेध आंदोलन केले. ( फोटो - संतोष पडवळ )

## थोडक्यात बातम्या...



### द स्टडी हब लायब्ररीचे उद्घाटन

ठाणे (स. गांवकरी) : दिवा शहरात द स्टडी हब लायब्ररीचे उद्घाटन शिवसेना उपशहरप्रमुख अँड आदेश भगत यांच्या हस्ते करण्यात आले. पंकज तिवारी यांनी C A च्या शेवटच्या वर्षाला शिकणारे विद्यार्थी अभ्यास व वाचन करण्यासाठी डोंबिवलीला जातात त्यामुळे वेळ व पैसा खर्च होतो त्यामुळे दिवा शहरात सुद्धा सुसज्ज वाचनालय झालं पाहिजे म्हणून प्रयत्न केला आहे.




### 'सुदर्शन'च्या शिवालिका राजे यांना 'पीपल लीडर ऑफ इयर अवॉर्ड' प्रदान

पुणे (स. गांवकरी) : सुदर्शन केमिकल्स इंडस्ट्रीज लिमिटेडच्या हेड पीपल प्रॅक्टिसेस अँड चीफ सस्टेनेबिलिटी ऑफिसर शिवालिका राजे यांना 'पीपल लीडर ऑफ इयर अवॉर्ड' प्रदान करण्यात आला. नॅशनल एचआरडी नेटवर्क पुणे चॅप्टरचे अध्यक्ष अमन राजाबली यांच्या हस्ते शिवालिका राजे यांना सन्मानचिन्ह व मानपत्र देऊन सन्मानित करण्यात आले. शिवालिका यांनी या पुरस्काराबद्दल आनंद व्यक्त करताना हा पुरस्कार आई-वडील, मुलगी, सुदर्शन परिवाराला समर्पित करीत असल्याचे कृतज्ञतापूर्वक नमूद केले. प्रगती लीडरशिप संस्थेच्या वतीने पुणे स्टेशन येथील हॉटेल शेरेटॉन ग्रँड येथे झालेल्या सोहळ्यात रवींद्र मिरचंदानी, अरुणाभ मजुमदार, दिव्य रामरैका, नेहा परांजपे, कॅप्टन रमण रैना, कृष्णा नीलकांतन, श्वेता शुक्ला यांचाही सन्मान करण्यात आला. प्रसंगी प्रगती लीडरशिपच्या चेअरपर्सन अनु वाखलू यांच्यासह इतर मान्यवर उपस्थित होते. शिवालिका राजे म्हणाल्या, "सेवाभावी वृत्तीने केलेले काम नेहमी चांगले होते. त्यातून अनेकांच्या चेहऱ्यावर हसू फुलते. निस्पृह सेवा हा नेतृत्वाचा अविभाज्य भाग असून, गेल्या ३० वर्षांच्या करिअरमध्ये मीही हाच सेवाभाव जपत सहकाऱ्यांच्या, समाजाच्या कल्याणासाठी योगदान दिले आहे. सुदर्शन केमिकल्समध्येही सेवा या मूल्याला अतिशय महत्व आहे. उत्पादन प्लांटमध्ये महिलांना समान सेवेची संधी 'सुदर्शन'ने दिली आहे. आज तीनही शिफ्टमध्ये महिला सन्मानाने काम करीत आहेत. त्यांना सर्व प्रकारच्या आवश्यक सुविधा व पोषक वातावरण उपलब्ध करून देण्यावर 'सुदर्शन'ने भर दिलेला आहे."

### 'संतश्री' सारखी पुस्तके म्हणजे ज्ञानसमृद्धीची पुण्यफळेच होय

वडाळा महादेव (स. गांवकरी) : भारतीय पुराणग्रंथ ही आपली ज्ञानपीठे आहेत. त्यामध्ये श्रीमद भागवत कथा ही जीवन संजीवनी आहे.आजही उत्तम लेखन नजरेत भरणारे आहे. डॉ. बाबुराव उपाध्ये, प्रा.सौ.पल्लवी सैंदोरे यांनी संपादित केलेले 'संतश्री' सारखे पुस्तक ज्ञानसमृद्धीची पुण्यफळेच होय, असे विचार श्री अडबंगनाथ संस्थानचे मठाधिपती महंत अरुणनाथगिरीजी महाराज यांनी व्यक्त केले. श्रीरामपूरजवळील इंदिरानगर परिसरात निर्मळ परिवारातर्फे श्रीमद भागवत कथा ज्ञानयज्ञ सप्ताह सोहळा आयोजित केलेल्या प्रवचनात व 'संतश्री ' पुस्तक प्रकाशन सोहळ्यात ते बोलत होते. श्री चंद्रभान निर्मळ, सौ. कलावती निर्मळ, डॉ. कैलासराव निर्मळ, सौ. वैष्णवी कैलास निर्मळ, ओमराज कैलास निर्मळ, आर्यवीर केलास निर्मळ परिवाराने संतपूजन केले. डॉ. बाबुराव उपाध्ये यांनी पुस्तकाचा परिचय करून देऊन प्रास्ताविक केले. ह.भ.प. डॉ. पुरुषोत्तम कोळपकर यांनी महंत अरुणनाथगिरीजी महाराज यांचा मोठेपणा विशद केला. ह.भ.प. नीळकंठराव तरकासे यांनी श्रीमद भागवत गीत सादर केले. ह.भ.प. भागवतराव मुठे पाटील यांनी भागवतकथा प्रसंग विशद केला. भैरवनाथ ग्रामपंचायत लोकनियुक्त सरपंच सौ. दीपालीताई फरगडे, प्रविण फरगडे यांनी मनोगत व्यक्त केले. निर्मळ परिवार व फरगडे परिवारांचा सत्कार महंत अरुणनाथगिरीजी महाराज यांच्या हस्ते करण्यात आला. महाराजांनी अनेक भजने आणि श्रीकृष्णगीते अत्यंत भावमधूर संगीत स्वरात सादर केली. भक्तगणांनी त्यांना नृत्य स्वरूपात प्रतिसाद दिला. महंत अरुणनाथगिरीजी महाराजांनी आजची वाचन संस्कृती आणि ग्रंथ निर्मितीचे महत्त्व सांगितले. ग्रंथसमृद्धी ही मानवी संस्कृतीची खरी श्रीमंती असून 'श्रीअडबंगनाथ गाथा ','अरुणोदय ' पुस्तके ह.भ.प. नीळकंठराव तरकासे यांनी लिहिली, ह.भ.प. डॉ. पुरषोत्तम कोळपकर, डॉ. बाबुराव उपाध्ये श्रीअडबंगनाथ पुस्तक निर्मितीत खूप सहकार्य केले.

# बौद्ध तीर्थस्थाळा जवळील पर्वत रांगा नामशेष होण्याच्या मार्गावर ?

- नागपूर अधिवेशनात आ. बाबुराव कदम कोहळीकर यांनी उठवला आवाज.
- वारकवाडी वानवाडी येथील नियमबाह्य पर्वताचे उत्खणन थांबवा व कारवाई करण्याची केली मागणी

**तामसा : (समर्थ गांवकरी)**

तालुक्यातील वानवाडी वारकवाडी मांडवा परिसरातील सह्याद्रीच्या पर्वत रांगा सारख्या दिसणाऱ्या जाणाऱ्या रांगा होत येथे जागतिक दर्जाचे उर्गेन संघरक्षित ध्यान भावना केंद्र वारकवाडी हे बौद्ध धर्माचे पवित्र तीर्थस्थळ असून या ठीकाणी .

सर्व दूर पर्वत रांगा दिसून येतात पण एका खाजगी कंपनीचे गुत्तेदार मुरूम उत्खनन करून नामशेष करण्याच्या मार्गावर दिसून येत आहेत . तहसीलदार हदगाव यांच्याकडे कानाडोळा करीत आहेत की काय ? शासनाने याला परवाणगी दिली असली तरी ती नियमबाह्य असून याकडे हदगाव तहसीलदार यांनी कानाडोळा केल्यामुळे माननीय जिल्हाधिकारी नांदेड यांनी विशेष लक्ष घालून निसर्गरम्य पर्वत असलेल्या रांगा आज घडीला नामशेष होत असतांना दिसत आहेत . प्रशासकीय यंत्रणा यावर काही उपाययोजना करतील याकडे लक्ष




लागून असून ह्या रांगा निसर्गाचं सौंदर्य टिकून ठेवण्यासाठी कायमस्वरूपी ठेवावे अशी जनतेत मागणी होत आहे . याबाबत सविस्तर माहिती अशी की वर्धा ते नांदेड रेल्वे रस्त्याचे काम हादगाव तालुक्यात मोठ्या प्रमाणात चालू असून सदर काम आंध्र प्रदेश व तेलंगणा या राज्यातील एका मोठ्या एजन्सीला प्राप्त झाले असल्याचे समजते सदर रेल्वे कामासाठी लागणारा मुरूम 20 ते 25 हायवा टिप्पर गाड्यांमध्ये चार चार जेसीबीने खोदकाम करून चेनापुर घाटातून वाहतूक करून वारंगा डोंगरकडा बामणी या परिसरात नेऊन टाकला जात आहे तसेच त्यांनी गोणखणी ज उत्खनन करण्याची रीतसर परवानगी घेतली तरी हजारो ब्रास मुरमाची वाहतूक डोंगर खोदून घेऊन जात आहेत सदर डोंगराचा जमिनीचा मूळ मालक शेतकरी असल्याचे समजते सदर शेतकऱ्यांनी तो मुरूम विक्री केलेला असून तशी त्यांनी परवानगीही घेतली आहे पण कागदपत्रे परवानगी घेऊन शासनाच्या नियमाची पायमल्ली करून मुरमाची वाहतूक नियम बाह्य केल्या जाते एक तर मुरूम वाहतूक करताना परवानगी सूर्योदयापासून ते सूर्यास्तापर्यंत असते तसेच रस्त्याने जाणाऱ्या येणाऱ्या प्रवाशांना धुळीचा त्रास होऊ नये म्हणून त्यावर ताडपत्री टाकणे बंधनकारक असते आणि जमिनीच्या चार फूट खालील फुटाखाली गोण खनिज करण्यात येऊ नये ही शासकीय मालमत्ता म्हणून संबोधले जाते या सर्व नियमाची पायमल्ली करत रात्रंदिवस मोठमोठी यंत्रसामृगी माळ रानावर नेऊन संपूर्ण पर्वत पोखरून मुरमाची वाहतूक होत असते तसेच हायवा गाड्या चोरट्या मार्गाने मुरूम नेता असल्यामुळे घेऊन जात असताना मुरुमाच्या धुळीचा सामना येणाऱ्या जाणाऱ्या प्रवाशांना करावा लागत आहे त्यावर ताडपत्री तर कधीच टाकली जात नाही या परिसरातील तलाठी मंडळ अधिकारी यांनी याकडे कानाडोळा केलेला आहे सदर पर्वत आताही जेसीबी व इतर यंत्रसामृगीमुळे मोठ्या प्रमाणात नष्ट होण्याच्या मार्गावर आहे या परिसरात जागतिक दर्जाचे बौद्ध विहार आहे उर्गेन संघरक्षित ध्यान भावना केंद्र वारकवाडी हे जागतिक कीर्तीचे बौद्ध विहार व ध्यान भावना केंद्र आहे येथे देश विदेशात ध्यानसाधना करण्यासाठी बौद्ध बांधव उपासक उपासिका धम्मगुरू ये त आसतात येथील विहारात दररोज त्रीशरन पंचशीला व धम्माचे काम नित्य नियमित चालु आसते या कामाचा अभ्यास करून नुकतेच महाराष्ट्र शासनाने पर्यटन स्थळ घोषीत केले आहे उर्गेन संघरक्षीत ध्यान भावना केंद्रास पर्यटन स्थळाची घोषणा झाल्यामुळे अधिकच महत्व प्राप्त झाले आहे येथे उन्हाळ्यात व दिवाळी च्या सुट्या मध्ये धम्माचे ज्ञान संपादन करण्यासाठी व ध्यान भावना करण्यासाठी राज्यातून व देशातून मोठ्या प्रमाणात धम्म बांधव येत आसतात आता सध्या दिपवाळीच्या सुट्यामध्ये तिथे धम्मशीबार चालु असून दररोज धार्मिक कार्यक्रमा सोबत ध्यानसाधनेचा कार्यक्रम चालु असून आजूबाजूचा डोंगर जीसीबी च्या साह्याने खोदकाम करून हायवा गाड्या रात्रदिवस भरून जात आहेत त्यांचा कर्कश आवाजाने येथे धम्मज्ञान घेण्यास आलेल्या बौध्द बांधवान त्रास जाणवत आसल्याचे ऐकावयास मिळाले आहे तेव्हा मा जिल्हाधीकारी नांदेड यांनी विशेष लक्ष घालुन निसर्गरम्य परीसर आसलेला वानवाडी वारकवाडी परिसरातील डोंगरांचे नियमबाह्य उत्ख णन करणाऱ्या एजन्सीवर कार्यवाही करून निसर्गरम्य वातावरणाचा भाग म्हणून संबोधल्या जाणाया नामशेष होणाऱ्या पर्वत रांगा जैसे थे ठेवण्यासाठी प्रयत्न करावेत अशी जनमाणसात मागणी होत आहे.

# डॉ. पूजा भालेराव यांना महाराष्ट्र गौरव पुरस्काराने सन्मान

**किनवट : (समर्थ गांवकरी)**

आदिवासीबहुल किनवट तालुक्यात मानसिक आरोग्याच्या क्षेत्रात सातत्याने व निष्ठेने कार्य करणाऱ्या मानसोपचार तज्ज्ञ डॉ. पूजा नंदा दत्तात्रय भालेराव यांना महाराष्ट्र गौरव पुरस्कार प्रदान करून सन्मानित करण्यात आले. पुणे येथे बुधवारी (ता. १०) आयोजित समारंभात हा सन्मान देण्यात आला.

महाराष्ट्र युनिव्हर्सल फाउंडेशन यांच्या वतीने सामाजिक, शैक्षणिक व आरोग्य क्षेत्रात उल्लेखनीय काम करणाऱ्या मान्यवरांचा गौरव करण्यासाठी या कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले होते. यावेळी आदिवासी व ग्रामीण भागात मानसिक आरोग्याविषयी जनजागृती, उपचार व समुपदेशनाचे कार्य करणाऱ्या डॉ. पूजा भालेराव यांच्या कार्याची दखल घेत त्यांना यंदाचा महाराष्ट्र गौरव पुरस्कार व सन्मानपत्र देऊन गौरविण्यात आले.

डॉ. पूजा भालेराव या किनवट तालुक्यासह दुर्गम व आदिवासी भागात मानसिक आजारांबाबत



असलेली भीती, गैरसमज आणि सामाजिक कलंक दूर करण्यासाठी प्रयत्नशील आहेत. आधुनिक जीवनशैली, तांत्रिक साधनांचा वाढता वापर, कौटुंबिक ताणतणाव तसेच कोविडनंतर निर्माण झालेल्या मानसिक समस्यांमध्ये मोठ्या प्रमाणात वाढ झाली असतानाही ग्रामीण भागात या विषयाकडे पुरेसे लक्ष दिले जात नसल्याची बाब त्यांनी सातत्याने अधोरेखित केली आहे. अशा परिस्थितीत त्यांनी रुग्णसेवा, समुपदेशन शिबिरे, जनजागृती उपक्रम आणि उपचारांच्या माध्यमातून महत्त्वपूर्ण योगदान दिले आहे.

पुरस्कार स्वीकारताना डॉ. भालेराव यांनी आपल्या भावना व्यक्त करताना सांगितले की, "वेगवेगळी गॅझेट्स, यांत्रिकीकरण, आधुनिक जीवनशैली, नातेसंबंधांतील तणाव आणि कोविडमुळे मानसिक रुग्णांची संख्या प्रचंड वाढली आहे. मात्र आजही ग्रामीण भागात मानसिक आरोग्यासाठी शासकीय व खाजगी यंत्रणा अपुऱ्या आहेत. त्यामुळे रुग्णांचे प्रश्न अधिक गंभीर होत आहेत.

आदिवासी भागात मानसोपचार तज्ज्ञ म्हणून केलेल्या माझ्या कामाची महाराष्ट्र युनिव्हर्सल फाउंडेशनने दखल घेतली, याचा आनंद आहेच; परंतु या पुरस्कारामुळे माझ्यावरची जबाबदारी आणखी वाढली आहे."

या सन्मानाबद्दल किनवट तालुक्यासह संपूर्ण नांदेड जिल्ह्यातून डॉ. पूजा भालेराव यांच्यावर अभिनंदनाचा वर्षाव होत आहे. त्यांच्या या यशामुळे ग्रामीण व आदिवासी भागातील मानसिक आरोग्य सेवेच्या कार्याला नवी प्रेरणा मिळाली आहे.



# चैनपूरात शॉर्टसर्किटने ऊसाला आग; शेतकऱ्याचे मोठे नुकसान

- नगरपरिषदेच्या अग्निशमन दलाने आग आटोक्यात आणली


**देगलूर : (समर्थ गांवकरी)**

तालुक्यातील मौजे चैनपुर येथील एका शेतकऱ्याच्या शेतातील ऊसाला शॉर्टसर्किटने लागलेल्या आगीत उसाचे मोठे नुकसान झाले. दरम्यान गावकऱ्यांनी आग लागल्याची घटना देगलूर नगरपरिषदेच्या मुख्याधिकाऱ्यांना कळविल्यानंतर अग्निशामक दलाने तत्काळ आग आटोक्यात आणण्यासाठी परिश्रम घेऊन आग नियंत्रणात आणली. मौजे चैनपुर येथील शेतकरी शेषेराव विठ्ठलराव देशमुख यांचे दोन एकर शेत असून शेतात डीपी बसवलेली आहे. शुक्रवारी दिनांक १२ रोजी सायंकाळी डीपीतील शॉर्टसर्किटमुळे आग लागली. ती आग ऊसाला लागली, बघता बघता अगिने रौद्ररूप धारण केले.

आग लागल्यानंतर गावातील तरुणांनी आग आटोक्यात आणण्याचा प्रयत्न केला. मात्र आग मोठ्या प्रमाणात लागल्याने ती सर्वत्र पसरू लागली त्यानंतर गावकऱ्यांनी नगरपरिषदेचच्या मुख्याधिकाऱ्यांना मोबाईल द्वारे सांगितल्यावर अग्निशमन दलाला प्राचारण केले .

# आमच्या मुलांच्या भविष्यासोबत खेळ करू नका : पालकांचा इशारा

## आखरगा जि. प. शाळेचा कारभार चव्हाट्यावर



**मुखेड : (समर्थ गांवकरी)**

खासगी तसेच स्वयंसहायित शाळांच्या स्पर्धांमध्ये जिल्हा परिषदेच्या शाळा टिकवून ठेवण्यासाठी स्थानिक पातळीवर शिक्षकांना मोठा संघर्ष करावा लागत आहे. परंतु, शिक्षण विभाग आणि शासनाच्या उदासिनतेमुळे शिक्षकांचे प्रयत्न कमी पडत असून जिल्हा परिषदेच्या शाळांचे अस्तित्व टिकवून ठेवण्याचे त्यांच्यापुढे मोठे आव्हान उभे ठाकले आहे. मुखेड तालुक्यातील आखरगा येथील जिल्हा परिषद शाळेमध्ये विद्यार्थ्यांच्या सुरक्षिततेसाठी सिसिटीव्ही बसविण्यासाठी ग्रामस्थांनी आग्रह धरलेला आहे. मात्र, शासनाकडून यासाठी कुठल्याही प्रकारचा फंड दिला जात नसल्यामुळे, हे काम लोकसहभागातून करावे लागणार आहे. त्यासाठी शाळेतील शिक्षकांसोबतच गटशिक्षण अधिकारी बी. एम. पाटील, मुख्याध्यापक वसंत पवार, केंद्र प्रमुख उमाकांत मैलारे हे प्रयत्नशील आहेत. आखरगा जिल्हा परिषद शाळेमध्ये बहुतांश मुले ही ऊसतोड मजुरांची आहेत.

त्यांना दर्जेदार शिक्षण देण्याची मोठी जबाबदारी शिक्षकांवर येवून पडलेली आहे. परंतु, सुविधा नसल्याने शिक्षकांना अडचणी येत आहेत. त्यामुळे आमच्या मुलांच्या भविष्यासोबत खेळू नका, असा इशारा येथील ग्रामस्थांनी दिला आहे.

येथील ग्रामस्थ बालाजी गोपनार यांनी दिलेल्या निवेदनात म्हटले आहे की, आखरगा येथील जिल्हा परिषदेच्या शाळेत शाळेत फुगवलेली पटसंख्या, शिक्षकांची नियमित अनुपस्थिती, रजिस्टरमध्ये फेरफार, पोषण आहारातील अनियमितता, शाळेच्या चाव्या बाहेर ठेवणे असे धक्कादायक प्रकार समोर आले आहे. शालेय व्यवस्थापन समितीचा कार्यकाळ दोन वर्षाचा असतो पण आखरगा येथील शाळेतील समिती मात्र तीन वर्षापासून कार्यरत असून बेकायदेशीर रित्या व्यवहार करत आहे यासाठी समिती बरखास्त करा .ह्या जिल्हा परिषद शाळेत पहिली ते आठवीपर्यंत विद्यार्थी शिक्षणाचे धडे गिरवीत आहेत.

## लोकवर्गणीतून विकास करावा लागणार

जिल्हा परिषदेकडून फंड नसल्यामुळे लोकवर्गणीतून सिसिटीव्हीसह इतर मुलभूत सुविधा कराव्या लागणार आहेत. मुख्याध्यापक वसंत पवार, केंद्र प्रमुख उमाकांत मैलारे यांनाही ग्रामस्थांची बैठक घेवून तरतूनद करण्याच्या सूचना दिल्या आहेत.

**-बी.एम. पाटील, गट शिक्षणाधिकारी**

आखरगा जिल्हा परिषद शाळेत सुरु असलेल्या सावळागोंधळाची तत्काळ चौकशी करून खोटी पटसंख्या प्रत्यक्ष तपासणीद्वारे उघड करावी तसेच वर्गनिहाय गुणवत्ता तपासावी, शालेय व्यवस्थापन समितीची नव्याने निवड करावी, पोषण आहाराच्या अनियमिततेविरुद्ध दंडात्मक कारवाई करावी. विशेष म्हणजे दरवर्षी शाळेला ५० हजार रुपयांचे अनुदान मिळते. परंतु, त्याचा विनियोग होताना दिसत असून, त्याची चौकशी करावी. अन्यथा आंदोलन करण्यात येईल.

**- बालाजी गोपनार (ग्रामस्थ, आखरगा)**

हे पत्रक मालक, मुद्रक, प्रकाशक, संपादक डॉ. विश्वासराव आनंदराव आरोटे यांनी सोनेरी छत्रपती प्रिंटर्स, भिंगारे गोडावूनजवळ, अकोले, ता. अकोले, जि. अहमदनगर – ४२२६०१ (महाराष्ट्र) येथे छापून दैनिक समर्थ गांवकरी कार्यालय, भिंगारे गोडावूनजवळ, अकोले, ता. अकोले, जि. अहमदनगर – ४२२६०१ (महाराष्ट्र) येथे प्रकाशित केले. This newspaper is printed by owner, printer, publisher, editor Vishwasrao Anandrao Arote at Soneri Chhatrapati Printers, Near Bhingare Godown, Akole, Tq. Akole, Dist. Ahmednagar - 422601.
पुणे निवासी संपादक : प्रतिक गंगणे, मुंबई विभागीय संपादक : दशरथ चव्हाण, व्यवस्थापक : संजय फुलसुंदर कार्यकारी संपादक : नवनाथ जाधव, अ‍ॅड. रचना भालके (हायकोर्ट), ठाणे
पुणे विभागीय कार्यालय : फ्लॅट नं. ४०६, व्यंकटेश विश्व, अभिरूची परिसर समोर, पारे कंपनी रोड, नऱ्हे, पुणे – ४११०४१ / ठाणे विभागीय कार्यालय : A-1, भाग्यश्री छाया, बेसमेंट, आवाज रेडिओ जवळ, डेअरी कॉटेज, इदुलजी रोड, चाराई, ठाणे (वे.)

# कर्डिले साहेबांचे विचार पुढे नेण्यासाठी जनतेसोबत राहू : अक्षय कर्डिले

## जनतेच्या विश्वासाला कधीही तडा जाऊ दिला नाही कामातूनच राजकारणाची ओळख निर्माण केली ; माजी खासदार डॉ. सुजय विखे पाटील

**ब्राम्हणी (ता. राहुरी) : (समर्थ गांवकरी)**



राजकारणात भाषणे कमी आणि प्रत्यक्ष काम अधिक झाले पाहिजे. जनतेने दिलेल्या विश्वासाची परतफेड केवळ आश्वासनांतून नव्हे, तर ठोस कामांतूनच झाली पाहिजे. जनतेच्या विश्वासाला कधीही तडा जाऊ दिला नाही आणि पुढेही देणार नाही, असे ठाम प्रतिपादन माजी खासदार डॉ. सुजय दादा विखे पाटील यांनी केले. सामाजिक न्याय व अधिकारिता मंत्रालय, ALIMCO, डॉ. विठ्ठलराव विखे पाटील फाउंडेशन संचलित जिल्हा दिव्यांग पुनर्वसन केंद्र, प्रधानमंत्री दिव्याशा केंद्र व ब्राम्हणी ग्रामपंचायत यांच्या संयुक्त विद्यमाने आयोजित दिव्यांग व ज्येष्ठ नागरिकांना सहाय्यक साधन वाटप व विविध विकास कामाच्या लोकार्पण व भूमिपूजन कार्यक्रमात ते बोलत होते. या कार्यक्रमाचे अध्यक्षस्थान ब्राम्हणी गावचे ज्येष्ठ नेते कार्यक्रमाचे अध्यक्ष बाळकृण बानकर डॉ तनपुरे कारखान्याचे माजी अध्यक्ष नामदेवराव ढोकणे विक्रमराव तांबे विजयराव बानकर उत्तमराव आढाव उत्तमराव म्हसे शरद पेरणे रविंद्र म्हसे सिताराम ढोकणे अमोल भनगडे आर आर तनपुरे धनंजय आढाव आशिष बिडकर अनिल आढाव भाजपा तालुका अध्यक्ष सुरेशराव बानकर सरपंच सुवर्णा बानकर उपसरपंच महेंद्र तांबे मधुकर पवार किशोर वने उत्तम खुळे गिरीराज तारडे भानुदास मोकाटे दिलीप तारडे अनिल ठबे बाळासाहेब जाधव अरुण बानकर अशोक नगरे समीर पठाण नंदु शिंदे तसेच भाजप महायुतीचे पदाधिकारी, कार्यकर्ते, विविध गावांतील ज्येष्ठ नागरिक, दिव्यांग लाभार्थी, पत्रकार, माता-भगिनी व ग्रामस्थ मोठ्या संख्येने उपस्थित होते.

डॉ. सुजय विखे पाटील पुढे म्हणाले की, स्वर्गीय कर्डिले साहेबांनी आपले संपूर्ण आयुष्य सर्वसामान्य, शेतकरी आणि राहुरी तालुक्याच्या विकासासाठी समर्पित केले. निवडणूक जिंकणे किंवा पद मिळवणे हे कधीच त्यांचे अंतिम ध्येय नव्हते. जनतेचे प्रश्न सोडवणे हेच त्यांचे खरे राजकारण होते. त्यांच्या संकल्पनेतूनच या योजनेची सुरुवात ब्राम्हणी गावातून झाली आणि आज ती प्रत्यक्षात उतरलेली पाहणे हे समाधानाचे आहे ते पुढे म्हणाले मी आज खासदार नसलो तरी माझे काम थांबलेले नाही. अवघ्या सहा महिन्यांत महाराष्ट्रातील सर्वात मोठा साखर कारखाना उभा केला असून, या एका महिन्याला दीड लाख टनांहून अधिक उसाचे गाळप केले जात आहे. माजी खासदार असलो तरी शेतकऱ्यांचा ऊस नेण्याचे आणि ज्येष्ठ नागरिक व दिव्यांग बांधवांना आवश्यक साहित्य देण्याचे काम मी सातत्याने करत राहणार आहे, असेही त्यांनी स्पष्ट केले. व राजकारणात कोणताही स्वार्थ न ठेवता काम केल्याचा पुनरुच्चार करताना ते म्हणाले की, ग्रामपंचायत, सरपंच, आमदार, खासदार किंवा मंत्रीसर्व पदे ही जनतेची सेवा करण्यासाठी असतात. जनतेने दिलेल्या प्रत्येक संधीचा उपयोग सर्वसामान्यांच्या हितासाठीच झाला पाहिजे. आज मिळालेले साहित्य योग्य वापरात आणावे, हाच या उपक्रमाचा खरा उद्देश असल्याचे मत त्यांनी व्यक्त केले.

यावेळी युवा नेते अक्षय कर्डिले यांनी भावनिक शब्दांत आपली भूमिका मांडली. ते म्हणाले की, आजचा हा कार्यक्रम आनंदाचा असला तरी कर्डिले साहेब आपल्या सोबत नसल्याची उणीव प्रत्येक क्षणी जाणवत आहे. हा उपक्रम त्यांच्या संकल्पनेतूनच नियोजित झाला होता.

जनतेवर, विशेषत ब्राम्हणी गावावर त्यांचे अपार प्रेम होते. ब्राह्मणीतील कोणताही नागरिक कुठल्याही विषयासाठी साहेबांकडे गेला, तरी त्यांनी कधीही नकार दिला नाही. आजपर्यंत साहेबांकडे ठेवलेल्या सर्व अपेक्षा पूर्ण करण्याची जबाबदारी आता आम्हा सर्वांवर आहे. कर्डिले साहेबांचे आशीर्वाद आणि डॉ. सुजय विखे पाटील तसेच नामदार डॉ. राधाकृष्ण विखे पाटील यांचे मार्गदर्शन हीच आमची खरी ताकद आहे, असल्याचे त्यांनी यावेळी सांगितले. तसेच, राज्याचे मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस, उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे व अजित पवार, पालकमंत्री डॉ. राधाकृष्ण विखे पाटील यांच्या सहकार्याने तालुका व जिल्ह्यातील सर्वसामान्यांचे प्रश्न सोडवण्यासाठी आम्ही एकत्रितपणे काम करत राहू. कर्डिले साहेबांना सर्वाधिक प्रिय असलेली गोष्ट म्हणजे जनतेत राहणे, जनता दरबार घेणे आणि शेवटच्या घटकापर्यंत पोहोचणे. त्याच विचारांवर चालत शेवटच्या श्वासापर्यंत जनतेसाठी काम करत राहण्याचा शब्द मी आज देतो.

# साखर कारखान्यांनी तोडला साडेतीन लाख मे. टन ऊस

■ खाजगी कारखान्याने दिला प्रतिटन ३ हजार रुपये भाव

**राहुरी : (समर्थ गांवकरी)**



गेल्या महिन्याभरात राहुरी तालुक्यातून जवळपास साडेतीन लाख मेट्रिक टन वेगवेगळ्या साखर कारखान्यांनी आपापल्या साखर कारखान्यात गाळपासाठी तोडून नेला आहे . थंडीच्या कडाक्यात ऊस हंगाम जोरात सुरू असल्याचे चित्र दिसून येत आहे .

यंदा अतिवृष्टी झाल्याने अनेक पिकांचे नुकसान झाले तसेच ऊस क्षेत्रातही मोठ्या प्रमाणात नुकसान झाले . यंदाचा वर्षीचा ऊस गाळप हंगाम नोव्हेंबर महिन्यात दिवाळीनंतर सुरू झाला , त्यामुळे ऊस गाळप हंगामांकडं सर्वांचे लक्ष लागलेले होते . राहुरी तालुक्यात गेल्या महिनाभरात साधारणतः साडेतीन लाख मॅट्रिक टन राहुरी तालुक्यातील प्रसाद शुगर या खाजगी साखर कारखान्यासह जिल्ह्यातील व शेजारील जिल्ह्यातील साखर कारखान्यांनी आपल्या कारखान्यात ऊस गाळपासाठी तोडून नेला आहे . तसेच उसाचे पहिले पेमेंट 3 हजार रुपयांपासून तर 3 हजार 300 पर्यंत विविध साखर कारखान्यांनी ऊस उत्पादक शेतकऱ्यांना जाहीर केले आहे . कठीण परिस्थितीतही ऊस उत्पादकांनी आपला ऊस साखर कारखान्यांना दिला आहे .

राहुरी तालुक्यातील प्रसाद शुगर साखर कारखाना कारकारखान्याने आज अखेर जवळपास पावणेदोन लाख मेट्रीक टन उसाचे गाळप केले असल्याचे समजते . दरम्यान , प्रसाद शुगर ने उसाची उचल तीन हजार रुपये ऊस उत्पादकांच्या खात्यात जमा केल्याचा फोटो सोशल मीडियावर व्हायरल झाला आहे . या बाबत प्रसाद शुगरच्या व्यवस्थापन कार्यालयाशी संपर्क झाला नाही .

# धरणे आंदोलन

**राहुरी: (समर्थ गांवकरी)**

माजी राज्यमंत्री बच्चुभाऊ कडू यांच्या नेतृत्वाखाली महाराष्ट्र सह अहिल्यानगर प्रहार दिव्यांग संघटनेच्या वतीने जिल्हाधिकारी कार्यालयासमोर धरणे आंदोलन करत जिल्हाधिकारी पंकज आशियासाहेब यांना शासन निर्णयानुसार आमदार, खासदार फंडातून 5 टक्के निधी नियमित खर्च करण्यात यावा.दिव्यांग बांधवांचा सरसकट घरकुलचा ला मिळावा . काही सध्या दिव्यांग बांधवांना 1500 रुपये संजय गांधी निराधार योजनेचा लाभ मिळतो सर्व दिव्यांग बांधवांना 2500 संजय गांधी चा लाभ मिळाला पाहिजे शासन निर्णयानुसार पालकमंत्री जिल्हाधिकारी आमदार खासदार यांच्या अध्यक्षतेखाली जिल्हा व तालुका स्तरावर समित्या तात्काळ गठित करण्यात यावा जिल्हा नियोजन समितीतील 1% निधी दिव्यांगावर खर्च करण्यात यावा.

# किरण बी. बाचकर यांचा फ्रीशिपमधून सरकारी कोट्यातून बीएमएसला प्रवेश

## अत्यंत बिकट परिस्थितीतून यशाची झेप विविध क्षेत्रातुन सर्वत्र अभिनंदनचा वर्षाव

**श्रीरामपूर : (समर्थ गांवकरी)**



तालुक्यातील खंडाळा येथील किरण बाबुराव बाचकर या विद्यार्थ्यांने आपल्या जिद्द, चिकाटी आणि कठोर परिश्रम यासोबतच अत्यंत हलाखीच्या आर्थिक परिस्थितीत शिक्षण घेवून बी एम एस डॉक्टर ला नंबर मिळविल्याबद्दल विविध क्षेत्रातून सर्वत्र त्यांचेवर अभिनंदनाचा वर्षाव होत आहे. विद्यार्थी "किरण बाबुराव बाचकर" यांनी आपल्या खंडाळा या गावी जिल्हा परिषदेच्या शाळेत इयत्ता १ ली ते ४ थी पर्यंत चे प्राथमिक शिक्षण घेऊन उर्वरित इयत्ता ५ वी ते १० वी रयत शिक्षण संस्थेचे न्यू इंग्लिश स्कूल खंडाळा याठिकाणी, तर ११ वी १२ वी पर्यंत चे शिक्षण रयत शिक्षण संस्थेचे रावबहादुर नारायणराव बोरावके (आरबीएनबी) महाविद्यालय या उच्चशिक्षण संस्थेत इयत्ता दहावीत ९७.२० % मार्क व इयत्ता बारावीत ७१.५० % मार्क मिळवून सरकारी कोट्यातून फ्रीशिप अंतर्गत पुढील बी.एम.एस. अभ्यासक्रमासाठी प्रवेश मिळवून उल्लेखनीय यश संपादन केले आहे. त्यांच्या घरची आर्थिक परिस्थिती तशी बिकटच आई - वडील मोलमजुरी करून कुटुंबाचा उदरनिर्वाह करतात, घरची आर्थिक परिस्थिती अत्यंत कुमकुवत असतानाही शिक्षणाची ओढ आणि पुढे काहीतरी करण्याची जिद्द मनात ठेवून विद्यार्थी किरण बाचकर यांनी बारावीपर्यंत आरबीएनबी महाविद्यालयात शिक्षण पूर्ण केले, अनेक अडचणी आणी कठिण परिस्थितीवर यशस्वीरित्या मात करत त्यांनी बी एम. एस.प्रवेश प्रक्रियेत सहभाग घेतला आणि अंतर्गत सरकारी कोट्यातून बी.एम. एस. डॉक्टर ला नंबर मिळवला. या यशामुळे परिसरात त्यांच्या मेहनतीचे कौतुक होत असून सर्वत्र अभिनंदनचा वर्षाव केला जात आहे, त्यांना प्राध्यापक शेळके सर व पटारे सर आणि कॉलेजमधील शिक्षक वृंद यांचेकडुन मोलाचे मार्गदर्शन लाभले, त्यांच्या या यशाबद्दल आई- वडील, मित्र परिवार,नातेवाईक, माजी सैनिक संघर्ष समिती व अनेक सामाजिक कार्यकर्त्यांकडून शुभेच्छांचा वर्षाव होत आहे. पुढे उच्च शिक्षण घेऊन समाजासाठी काहीतरी करणे असे त्यांनी आपल्या मनोगतात यावेळी बोलताना सांगितले.

# नागवडे स्कूलचा क्रीडा सप्ताह उत्साहात संपन्न

■ खेळामुळे जीवनात सकारात्मकता : तालुका क्रीडा अधिकारी दिलीप दिघे

**श्रीगोंदा : (समर्थ गांवकरी)**




श्रीगोंदा येथील तुळजाभवानी सेवा प्रतिष्ठान संचलित शिवाजीराव नागवडे डॅफोडील्स स्कूल व कौशल्यादेवी नागवडे इंग्लिश मीडियम स्कूल यांचा वार्षिक क्रीडा महोत्सव मोठ्या उत्साहात पार पडला. सुरेख सजवलेले मैदान, रंगीबेरंगी सजावट आणि चिमुकल्या खेळाडूंच्या जोशपूर्ण घोषणांनी परिसर गजबजून गेला. क्रीडा महोत्सवाचे उद्घाटन तालुका क्रीडा अधिकारी दिलीप दिघे यांच्या हस्ते झाले. यावेळी प्रा. सचिन आगळे, प्रा. किरण बंड, शालेय निरीक्षक एस. पी. गोलांडे व अशोक गिरमकर हे प्रमुख पाहुणे उपस्थित होते. लेझीम पथकाच्या सादरीकरणाने पाहुण्यांचे स्वागत करण्यात आले. क्रीडा ज्योतीच्या प्रज्वलनाने सप्ताहाची औपचारिक सुरुवात झाली. शिस्तबद्ध परेड संचलनातून विद्यार्थ्यांच्या शिस्तीचे दर्शन घडले, तर क्रीडा नृत्य व सरप्राइज डेमोने कार्यक्रमात रंगत आणली. अध्यक्षीय भाषणात तालुका क्रीडा अधिकारी दिलीप दिघे यांनी शालेय जीवनातील खेळांचे महत्त्व विशद करत खेळामुळे शारीरिक तंदुरुस्ती, मानसिक बळ व सकारात्मक दृष्टिकोन विकसित होतो, असे सांगितले. विद्यालयाचे विद्यार्थी दरवर्षी एसएससी परीक्षेसह विविध स्पर्धा परीक्षांमध्ये राज्य गुणवत्ता यादीत स्थान मिळवत असून क्रीडा क्षेत्रातही राष्ट्रीय पातळीवर यश संपादन करीत आहेत, असे गौरवोद्गार निरीक्षक एस. पी. गोलांडे यांनी काढले. यावेळी राज्य व राष्ट्रीय पातळीवर प्रावीण्य मिळविलेल्या खेळाडूंचा सन्मान करण्यात आला. क्रीडा सप्ताहात अ‍ॅथलेटिक्ससह फुटबॉल, व्हॉलीबॉल, डॉजबॉल, कबड्डी, चेस, रस्सीखेच, लंगडी, तायक्वांदो तसेच विविध मनोरंजनात्मक खेळांच्या स्पर्धा उत्साहात पार पडल्या.

# पुणे मॅजिशियन्सची विजयी सुरुवात

**पुणे : (समर्थ गांवकरी)**

नेहरूनगर-पिंपरी येथील मेजर ध्यानचंद हॉकी स्टेडियमवर सुरू झालेल्या भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर हॉकी स्पर्धेत पुणे मॅजिशियन्स आणि पुणे शहर पोलिसांनी अनुक्रमे किड्स इलेव्हन आणि हॉकी लव्हर्सविरुद्ध सहज विजय मिळवत शानदार सुरुवात केली. ही नॉक-आउट स्पर्धा हॉकी महाराष्ट्राच्या वतीने आयोजित केली जात असून डॉ. आंबेडकर यांच्या १३४ व्या जयंती सोहळ्याचा भाग आहे. पहिल्या दिवशी शनिवारी, पुणे मॅजिशियन्सनी किड्स इलेव्हनचा ४-० असा पराभव केला. पुणे शहर पोलिसांनी हॉकी लव्हर्स संघाला त्याच फरकाने हरवले.

# रयत अ‍ॅकॅडमीचे ४ विद्यार्थी भारतीय सैन्यात दाखल

■ महाविद्यालयात आनंदाचे वातावरण

**श्रीगोंदा तालुका: (समर्थ गांवकरी)**




महाराजा जिवाजीराव शिंदे महाविद्यालयातील कनिष्ठ विभागात चालविण्यात येणाऱ्या महाराजा रयत करिअर अकॅडमीमुळे विद्यार्थ्यांना करिअरच्या विविध संधी उपलब्ध होत आहेत. या अकॅडमीमधून प्रशिक्षण घेतलेल्या चार विद्यार्थ्यांनी यशाची शिखरे गाठत भारतीय सैन्यात निवड मिळवली आहे. करण धोत्रे, अभिषेक गोंधळी, साहिल ससाने आणि किरण डेवरे या विद्यार्थ्यांनी कठोर परिश्रम व तयारीच्या बळावर इंडियन आर्मीमध्ये दाखल होण्याचे स्वप्न पूर्ण केले. त्यांच्या या उल्लेखनीय यशाबद्दल महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. महादेव जरे यांनी गौरव व्यक्त करून अभिनंदन केले. याप्रसंगी महाविद्यालय विकास समितीचे चेअरमन मा. बबनराव पाचपुते, जिल्हा परिषद अध्यक्ष बाबासाहेब भोस, मॅनेजिंग कौन्सिल सदस्य राहुल जगताप, महावीर पटवा, उपप्राचार्य, पर्यवेक्षक, रयत हितचिंतक तसेच विद्यार्थी यांनीही त्यांचे कौतुक करत पुढील वाटचालीसाठी शुभेच्छा दिल्या.

# कुमारी हर्षली नारायण आरोटे हिचे सलग आठही वाढदिवस वृद्धाश्रमात साजरा

**नारायणगाव : (समर्थ गांवकरी)**



कुमारी हर्षली नारायण आरोटे हिचे सलग आठही वाढदिवस वृद्धाश्रमात, अनाथ आश्रम, मतिमंद मुलांची शाळा, बेवारस, अपंग व्यक्ती व श्री श्री ज्ञान मंदिर शाळा येथे साजरे करण्यात आले.

पुणे जिल्ह्यातील नारायणगाव येथील हर्षली कृषी उद्योग समूहाचे सौं.सोनाली आरोटे व श्री. नारायण आरोटे यांची कन्या कु. हर्षली हिचे सलग आठही वाढदिवस वृद्ध, अनाथ, अपंग, बेवारस, शालेय विद्यार्थी, ज्यांना कोणी लोक नाही असे, असे लोक यांचे समवेत साजरा करण्यात आला.

तसेच यापूर्वीचे सलग सातही वाढदिवस अनाठाई खर्चाला फाटा देऊन वेगवेगळ्या ठिकाणी साजरे करून जनतेपुढे आरोटे परिवाराने एक आदर्श ठेवला आहे.

1) हर्षली चा पहिला वाढदिवस अनाथ मुलांची आश्रम शाळा (पळस्टिका) घोडेगाव तालुका- आंबेगाव येथे अनाथ सर्व बालकांना शालेय वस्तूचे वाटप, जेवण, खाऊचे वाटप व केक कापून साजरा करण्यात आला.
2) हर्षली चा दुसरा वाढदिवस राजाराम पाटील वृद्धाश्रम - पांगरी माथा येथे सर्व वृद्ध लोकांना कपडे, जेवण देऊन केक कापून साजरा करण्यात आला.
3) हर्षली चा तिसरा वाढदिवस नानासाहेब देशमुख वृद्धाश्रम - केळुंगण (राजुर) तालुका - अकोले येथे सर्व वृद्ध लोकांना कपडे जेवण खाऊचे वाटप व केक कापून साजरा करण्यात आला.
4) हर्षली चा चौथा वाढदिवस नंदनवन - मतिमंद व दिव्यांग मुलांचा आश्रम -धामणखेल तालुका - जुन्नर येथे सर्व मुलांना स्वेटर, जॅकेट, जेवण व खाऊचे वाटप करून साजरा करण्यात आला.
5) हर्षली चा पाचवा वाढदिवस जुन्नर एज्युकेशन सोसायटीचे स्वर्गीय बन्सीलाल मोहनलाल मुथा मूकबधिर विद्यालय - जुन्नर येथील मूकबधिर मुलांच्या समवेत चाळीस विद्यार्थ्यांचा आनंद द्वि गणित करण्यासाठी व त्यांच्या चेहऱ्यावरील हास्य पाहण्यासाठी विद्यार्थी व विद्यार्थ्यांना पॅन्ट, टी-शर्ट, ट्रॅक सूट ड्रेस, जेवण व तसेच त्यांचे भोजनाची व्यवस्था करून केक कापून मोठ्या आनंदात साजरा करण्यात आला.
6) हर्षली चा सहावा वाढदिवस बाबा वृद्धाश्रम व नर्सिंग केअर सेंटर - वैशाख खेडे (पिंपळवंडी) तालुका- जुन्नर येथे सर्व वृद्ध लोकांना बसण्यासाठी खुर्च्या, टेबल, जेवण, आर्थिक मदत व खाऊ वाटप करून केक कापून मोठ्या उत्साहात साजरा करण्यात आला.
7) हर्षली चा सातवा वाढदिवस शिवरत्न युवा प्रतिष्ठान (वृद्धाश्रम- अक्षय बोऱ्हाडे) शिरोली बुद्रुक तालुका - जुन्नर येथे वृद्ध, अनाथ, अपंग, बेवारस यांचे समवेत ब्लँकेट, थंडीची कान टोपी, महिलांसाठी गाऊन व सर्वांसमवेत जेवण, खाऊ वाटप व केक कापून मोठ्या उत्साहात साजरा करण्यात आला.
8) हर्षलीचा आठवा वाढदिवस श्री श्री ज्ञान मंदिर शाळा - देवजाळी (हिवरे) तालुका- जुन्नर येथे विद्यार्थ्यांसाठी शालेय खेळाच्या वस्तू त्यात क्रिकेट खेळाचा पूर्ण सेट, हॉलीबॉल खेळाचा पूर्ण सेट, मल्लखांब, रिंगा, दोरीवरल्या उड्या, बॉल अशा विविध प्रकारचे खेळाचे साहित्य देऊन तसेच सस्नेह भोजन व रोटरी क्लब नारायणगाव हायवे मार्फत आरोग्य शिबिराचे आयोजन करून त्यात दंतचिकित्सा, हिमोग्लोबिन व हेयर चेकअप असे 125 विद्यार्थ्यांचे मोफत चेकअप करण्यात आले. त्यासाठी त्वचा व केस रोग तज्ञ रो.डॉ.उत्तमजी घोरपडे, बालरोग तज्ञ डॉ. तेजस बोळज मॅडम व डॉ. हेमलता गुळवे मॅडम, दंत रोग तज्ञ डॉ. श्रेया घाडगे मॅडम, रक्त तपासणी -हिंद लॅब - सौं. दिपाली फुलसुंदर व रोहन बोंबले यांनी विशेष योगदान दिले.

वाढदिवसाच्या निमित्ताने उपस्थित मान्यवर नारायणगाव नगरीचे लोकनियुक्त सरपंच मा. श्री. योगेश उर्फ बाबू भाऊ पाटे, कथे डायग्नोस्टिक सेंटरचे मा. श्री. डॉ. पंजाबराव कथे सर व सौ पिंकी कथे मॅडम, रोटरी क्लबचे अध्यक्ष रो. डॉ.उत्तमराव घोरपडे, वारुळवाडीचे उपसरपंच सौ. ज्योतीताई संते, येडगावचे मा. सरपंच श्री सतीशशेठ नेहरकर, पुणे जिल्हा बँकेच्या मा. संचालिका राजश्रीताई बोरकर, प्रियंका बोरकर, अर्थसंपदा पतसंस्थेचे संस्थापक अध्यक्ष मा. श्री.रमेशजी मेहत्रे,मा. आमदार बाळासाहेब दांगट यांच्या पत्नी सौं मंदाताई दांगट, वनरक्षक पवन भाऊ आहेर व रमेश खरमाळे साहेब, ट्रस्टी श्री. तुषार देवकर साहेब, प्रगतशील द्राक्ष बागायतदार राजूशेठ वायकर, विशालशेठ शिंदे, अमित तोडकर, पवन भाऊ वायकर, बाळासाहेब शिंदे, युवराजशेठ वायकर, समाधान ढवळे, कल्पेश शिंदे, युवराज ढवळे, ग्रामपंचायत सदस्य श्री.आरिफ आत्तार, श्री जालू भाऊ खैरे, श्री मंदार पाटे, श्री निलेश दादा दळवी, रोटरीन डॉ. श्रीकांत फुलसुंदर सर, शिवाजी टाकळकर सर, रवींद्र वाजगे सर, नितीन भुजबळ, बाळासाहेब ढमाले, हनुमंत भंडारी, शामराव थोरात, रामभाऊ सातपुते, सुकाजी मुळे, सुनील परदेशी, धनाजी बोरकर, साईनाथ संते, किसन आरोटे, शाम वैद्य, रामदास बाळसराफ, रोहिदास तांबे, अण्णा मुंडे गुरुजी, महेश दरेकर, दिग्विजय थिटे, विशाल वाघ साहेब, सागर टाले, शुभम पवार, विजय खेमनर, नितीन महांडुळे, कैलास विघ्ने, प्रणव संते, वैभव जाधव, ऋषिकेश काजळे, नवनाथ खराडे, संजय डिसले, सागर वाघमोडे, अनिल उडाणे, तांबोळी साहेब, सोनवणे साहेब, संदीप मुळे, शिंदे सर, मुख्याध्यापक गणेश थोरात, नाईकवाडी साहेब, सुशांत दवणे, विठ्ठल धोंडगे.


सौ. सोनाली आरोटे, मनीषा वायकर, वंदना आरोटे,, सुवर्णा मुळे, अश्विनी नेहरकर, मिरा वैद्य,उर्मिला वाजगे, अपेक्षा शिंदे, मुक्ता दरेकर, प्रियंका थिटे, देवकर मॅडम, मुळे मॅडम. तसेच या कार्यक्रमासाठी मा.श्री. बंटीशेठ बोरकर, श्री अण्णा वाकचौरे, श्री माऊली भागवत व श्री श्री ज्ञान मंदिर शाळा यांनी विशेष परिश्रम घेतले. या वाढदिवसानिमित्त मा.श्री. देवदत्तजी निकम साहेब, मा.श्री. सुरज भाऊ वाजगे, मा.श्री. माऊली शेठ खंडागळे व मा.श्री. विश्वासराव आरोटे साहेब यांनी फोन द्वारे शुभेच्छा दिल्या.

# पाच दिवस विलंबाने म्हणजे...



## संपादकीय

नगरपालिका, नगरपंचायत निवडणुका मतदारयादीतील घोळामुळे गाजल्या. आता महापालिका निवडणुकीत त्याच घोळाची पुनरावृत्ती होणार, असे संकेत दिसत आहेत. राज्यातील २९ महापालिकांमधील अंतिम मतदारयाद्या प्रसिद्ध करण्याची तारीख १० डिसेंबर होती. आता पाच दिवस विलंबाने म्हणजे १५ डिसेंबर रोजी मतदारयाद्या प्रसिद्ध होतील. त्यानंतर मतदानाच्या तारखांची घोषणा होईल. निवडणुका होतील. जे विजयी होतील ते मतदारयाद्या, निवडणूक यंत्रणा यांच्या पवित्रतेबद्दल व सात्त्विकतेबाबत गोडवे गातील. जे पराभूत होतील ते बोटे मोडतील व कदाचित शिव्याशापही देत बसतील. मतदारयाद्या, मतदान यंत्रे व निवडणूक प्रक्रिया याविरुद्ध काँग्रेस नेते राहुल गांधी यांनी सर्वप्रथम आवाज उठवला. मतदारयादीतील घोळाची उदाहरणे दिली. निवडणूक आयोगाने या दाव्याला उत्तर देण्याऐवजी सत्ताधारी पक्षाचे नेतेच प्रतिवाद करताना दिसले. महाराष्ट्रात स्थानिक स्वराज्य संस्थांच्या निवडणुकीची घोषणा झाल्यावर उद्धवसेनेचे नेते आदित्य ठाकरे, मनसे अध्यक्ष राज ठाकरे यांनीही मतदारयाद्यांमधील घोळाविरुद्ध गांधी यांच्या सुरात सूर मिसळला. काही शहरांत शिंदेसेनेनेही मतदारयाद्या सदोष असल्याचा आवाज उठवला. सत्ताधारी पक्षही मतदारयाद्यांवर संशय व्यक्त करू लागल्याने राज्य निवडणूक आयोगाची पंचाईत झाली. अनेक नेत्यांनी राज्य निवडणूक आयोग व आयुक्तांना आरोपीच्या पिंजऱ्यात उभे केले. वास्तविक आयोग व आयुक्तांचा थेट दोष नाही. राज्यात महापालिका, नगरपालिकांच्या निवडणुका जेव्हा जिल्हा प्रशासन म्हणजे जिल्हाधिकारी घेत होते, तेव्हा मतदारयादी नव्याने करण्याची पद्धत होती. माजी पंतप्रधान दिवंगत राजीव गांधी यांनी आपल्या कारकिर्दीत घटनादुरुस्ती करून स्थानिक स्वराज्य संस्थांना अधिकार दिले, महिलांना आरक्षण लागू केले व निवडणुका घेण्याकरिता स्वतंत्र राज्य निवडणूक आयोग स्थापन करण्याची तरतूद केली. त्यावेळी या आयोगाने आपल्या स्वतंत्र मतदारयाद्या तयार कराव्या, याद्यांमधील दोष दूर करावे,



हे अपेक्षित होते. मात्र महाराष्ट्रातील १९९५ मधील तत्कालीन सरकारने राज्य निवडणूक आयोग स्थापन करतानाच आयोगाला आपली मतदारयादी तयार करण्याचे अधिकार दिले नाहीत. महापालिका निवडणुकांपूर्वी झालेल्या निवडणुकीत जी मतदारयादी केंद्रीय निवडणूक आयोगाच्या देखरेखीखाली राज्यातील निवडणूक विभागाने तयार केली असेल, त्याच यादीच्या आधारे निवडणुका घेण्याची तरतूद केली. विधानसभा निवडणुकीत सपाटून मार खाल्लेल्या महाविकास आघाडीच्या नेत्यांनी ज्या मतदारयादीवर प्रश्नचिन्ह उपस्थित केले होते, त्याच यादीच्या आधारे निवडणूक घेणे राज्य निवडणूक आयोगाला क्रमप्राप्त असल्याने हा आयोग विरोधकांच्या टीकेच्या जात्यात भरडला गेला. सध्याच्या मतदारयाद्यांत दुबार नावे आहेत. मतदारयाद्या फोडताना एका प्रभागातील नावे दुसऱ्या प्रभागात गेली आहेत. बंद पडलेले कारखाने, स्मशानभूमी अशा ठिकाणी शेकडो मतदार दाखवले आहेत. एकाच घरात शेकडो मतदार दाखवण्याची किमया या यादीत असल्याचे दाखले दिले गेलेत. हे दोष दूर करण्याची यंत्रणा आयोगाकडे नाही. ही जबाबदारी आयोगाने महापालिका आयुक्तांवर ढकलली आहे. घरोघरी जाऊन सर्वेक्षण करून हे दोष दूर करण्याकरिता पुरेसा कर्मचारी वर्ग व उत्साह महापालिकांमध्येही नाही.

## दै. समर्थ गांवकरी सूडोकू क्र. ५९

| | | | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|---|---|
| | 1 | | | 5 | | 7 | | |
| 4 | | 5 | | 2 | | | | |
| 7 | | | 4 | | | | | |
| | 5 | | 6 | | | | 2 | |
| 6 | 4 | 7 | | | | 8 | 3 | 9 |
| | 8 | | | | 4 | | 5 | |
| | | | | | 8 | | | 1 |
| | | | | 7 | | 5 | | 8 |
| | | 8 | | 3 | | | 4 | |

उत्तर उद्याच्या अंकात

**खेळाचे नियम :** प्रत्येक उभी लाइन, आडवी लाइन आणि ३-३ च्या वर्गात १ ते ९ पर्यंतची संख्या भरा. परंतु ही अट आहे की, नंबरची पुनरावृत्ति कोणत्याही उभ्या किंवा आडव्या लाइन आणि चौकानात आली नाही पाहिजे. प्रत्येक कोडयाचे केवळ एकच उत्तर आहे.या कोडयाला भरण्यासाठी आपण पेन्सिलचा आणि खोड रबराचा उपयोग केला तर ते आपल्यासाठी अधिक सुविधा जनक होईल.

### सूडोकू क्र. ५८ चे उत्तर

| | | | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|---|---|
| 5 | 9 | 6 | 4 | 3 | 8 | 2 | 1 | 7 |
| 7 | 3 | 8 | 1 | 2 | 6 | 9 | 4 | 5 |
| 1 | 4 | 2 | 5 | 9 | 7 | 3 | 6 | 8 |
| 8 | 7 | 5 | 2 | 6 | 3 | 1 | 9 | 4 |
| 9 | 6 | 4 | 7 | 5 | 1 | 8 | 2 | 3 |
| 2 | 1 | 3 | 8 | 4 | 9 | 5 | 7 | 6 |
| 6 | 8 | 9 | 3 | 1 | 4 | 7 | 5 | 2 |
| 3 | 2 | 1 | 6 | 7 | 5 | 4 | 8 | 9 |
| 4 | 5 | 7 | 9 | 8 | 2 | 6 | 3 | 1 |

विक्रम संवत्- २०८२
मार्गशीर्ष शके
संवत्- १९४७
संवत्सर - विश्वावसूनाम
अयन- दक्षिणायान
मास- मार्गशीर्ष

ऋतु- सौर हेमंत
कृष्ण पक्ष
तिथि:दशमी १८:५०:०१
नक्षत्र:हस्त ०८:१८:१२
योग:सौभाग्य
११:४४:४९

करण:विष्टि १८:५०:०१
करण:बव (अहोरात्र)
सूर्य:वृश्चिक
चन्द्र:तुला२१:४१:१९
हिजरी सन् - १४४६
मुस्लिम मास

## उपदेशाचे डोस

दिवस होते पावसाळ्याचे. महात्मा गांधींजीचा आगगाडीनं प्रवास चालू होता. अचानक धो धो पाऊस कोसळू लागला अन् थोड्याच वेळात तर गांधीजींच्या डब्यात वरून पाणी ठिबकू लागलं. गार्डला हे कळलं. तो लगेच गांधीजींच्या डब्यापाशी आला. त्यानं पाहिलं तर ठिकठिकाणी बरेच पाणी ठिबकत होतं म्हणून तो जवळ आला नि गांधीजींना नम्रपणे म्हणाला, 'असं करा, तुम्ही दुसऱ्या डब्यात चला.'

गांधीजी - 'पण मग या डब्याचं तुम्ही काय कराल?'

गार्ड - तुमच्यासाठी पलीकडचा एक डबा रिकामा करवलाय मी; त्यातले लोक येऊन यात बसतील.'

गांधीजी : 'छे, छे असं करणं योग्य नाही. इथे त्यांच्या डोक्यावर नाही का वरून अभिषेक होणार? मग मला काय हरकत इथेच बसायला? मी मात्र सुख भोगायचं नि त्या बिचाऱ्या दुसऱ्यांनी माझ्यासाठी दुःख सहन करायचं हे कसं चालेल ! इथेच बसतो मी.' गार्ड सूज्ञ होता. त्याने विचारलं, 'बापू, माझ्यालायक काही सेवा?'

गांधीजी : 'उगीच कोणाला त्रास देऊ नको, अन् लाचबीच घेत जाऊ नका, हीच सेवा !'

**कथा उपदेश : जो दुसऱ्याचे दुःख जाणतो व दुसऱ्यासाठी स्वतः त्रास सहन करतो तोच खरा नेता होऊ शकतो.**

## इतिहासात आजचा दिवस

### आंतरराष्ट्रीय

- १९३१- फिनलंडवर आक्रमण केले म्हणून रशियाची 'लीग ऑफ नेशन्स' मधून हकलपट्टी.
- १९११- नॉर्विजियन ध्रुवप्रवासी रोआल्ड अमुंडसेन दक्षिणध्रवावर पहोचलेला पहिला मानव ठरला.

### राष्ट्रीय

- १३४४- तैमूरलंग (तैमूर लंगडा ऊर्फ टॅमरलेन) यांची भारतावर स्वारी.
- २००४- पंजाबमध्ये जम्मूतावी एक्स्प्रेस दुसऱ्या गाडीवर आदळून ३७ ठार.


### जन्म

- १५०३- मिशेल द नोस्त्रदास ऊर्फ भाविष्यवेत्त नोस्त्रादामस यांचा जन्म.
- १९१८- योगाचार्य बी.एस. अय्यंगार यांचा जन्म.
- १९३४- चित्रपटनिर्माते-दिग्दर्शक श्याम बेनेगल यांचा जन्म.
- १९३६- चार्ली ग्राफीथ या वेस्ट इंडीजच्या जलदगती गोलंदाजाचा जन्म.
- १९५३- विजय अमृतराज या भारताच्या टेनिसपटूचा जन्म.

### निधन

- १५४६- छत्रसाल बुंदेला याचे निधन.
- १७९९- अमेरिकेचे पहिले राष्ट्रध्यक्ष जॉर्ज वॉशिंग्टन यांचे निधन.
- १८४१- काश्मीरनरेश गुलाबसिंह यांचा सेनापती झोरावरसिंह याचे निधन. त्याने हिमालयाच्या रांगांमधील बल्टिस्तान, लाहौला-स्पिती आदी प्रदेश जिंकून काश्मीरला जोडले.
- १८६१- इंगलंडची राणी व्हिक्टोरियाचा पती प्रिन्स अल्बर्टचे निधन. त्याच्या स्मरणाथर लंडनमध्ये अल्बर्ट हॉल उभारण्यात आला.

## दै. समर्थ गांवकरी जम्बो शब्दकोडे क्र. ५९



**आडवे शब्द**

१. 'प्लॅटफॉर्म'ला मराठी शब्द
४. कलगीतुरा, वगाचा पूर्वार्ध
९. तपश्चर्या, तपस्या
१२. हालचाल
१५० गुंडाळी, पथारी
१६. वक्रता
१७. हात
१९. सापाचे आयते घर
२१. फुलातील बहुगुणी गोड रस
२२. चीजवस्तू
२४. नवरात्रातील नृत्यप्रकार
२६. आरोप, संशयस
२७. वेळ, ३०. वाळवंट
३२. थोर, ३३. वेदना
३५. मागणी, विनंती
३६. संतोष, आनंद
३८. तोफ वाहून नेणारी गाडी
३९. निकट, जवळ
४०. तोटी, ४१. तात्पुरता बांधलेला पूल
४३. तीनने गुणणे
४४. गेरू, ४५. सूट
४६. मालक, स्वामी
४७. आगबोट
४८. हातोहात, त्वरेने
५१. नाईलाज
५२. रत, निमग्न, ५३. गबाळ, ५५. समर्थ स्त्री
५६. नाश पावणारे
५७. समुद्र, ५९. लोक, प्रजा, ६२. मुंबईतील एक उपनगर
६४. त्रिदोषातील 'वैताग', ६५. राज्यकारभाराचे प्रमुख शहर
६७. नशीब, करतूत
६८. लोकनाट्यातील कलाकार
७१. विपत्तीची कहाणी
७२. फणसाचा एक प्रकार
७४. सुसर
७५. समानता
७७. मिठी
७९. जिभेला झोंबणारे
८०. परमेश्वर
८१. गजवदन

**उभे शब्द**

१. पाटी
२. सोन्याचा कस
३. जेवणाचे वा जेवणानंतर खाण्याचे
४. मनाला टोचणारे दु:ख
५. चणचण, उणीव
६. समीप, च्या पाशी
७. लहान मूल
८. निरर्थक बडबड
१०. वेगाने आदळत येणारे
११. याच्या शेंड्यावर राग वसतो
१३. बारीकसारीक
१४. नवरदेवाची आई
१८. रसपूर्ण
२०. भारतीय चलन
२१. असह्य वेदना
२३. फूल, पुष्प
२४. अरण्य, २५. मगज
२६. सुस्ती, २८. कांडप
२९. वेडावाकडा
३१. आकलन होण्यास कठीण असे
३२. अत्यंत गोड
३३. लाकूड कापण्याचे हत्यार
३४. पळून जाणे
३७. माणूस
४१. शिकार
४२. मनाचा ओढा
४४. वादळ
४५. चंदन उगाळण्याचा दगड
४६. पाठीवर मारलेली चापट
४७. हिशोब
४८. दागिना की कलंक?
४९. काळे ज्वालाग्राही खनिज
५०. व्यायाम
५१. निर्लज्ज
५३. घोडा
५४. जादूटोण्याचे मंत्रतंत्र
५६. अभिनेता
५८. एक शेंगभाजी
६०. टक, दृष्टी
६१. बाणेदार
६२. कातडे-चामड्याच्या वस्तू तयार करणारा
६३. निवासस्थान
६६. एकदम व जोरात (पडणे, आपटणे इ.)
६८. टिकून राहण्याचे बळ
६९. विनोबाजींनी लिहिलेली मराठी गीता
७०. यज्ञ, ७३. पाचू
७४. अभिप्राय
७५. पावसाची झड
७६. एक तंतुमय वनस्पती
७८. अरण्य, इंग्रजीत एक

**शब्दकोडे क्र. ५७ चे उत्तर**

आडवे उत्तर : १.सायकल ५. अना कलनीय १०.वमन ११.नागरिक १३.वट १४.जिम्मा १५.करंगळी १६अ.थामना १७.कसक १९.नर २१.वेतन २२.टसर २४.जलतरंग २७.कप २९.चिकोडी ३०.आतडी ३१.गळीत ३३.रमत गमत ३७.वही ३८.लज्जास्पद ३९.हिना ४०.ब्येस ४२.वाटप ४४.नरम ४६.रत ४८.रमा ५१.नीज ५३.भूतनात ५५.रमताराम ५७.काटकसर ५९.कमाल ६०.तडकाफडकी ६१.कापणे ६३.हत्यार ६४.वर ६६.कोर ६७.तरु ७०.चेक ७१.कातकरी ७२.जाणता ७३.पवनपुत्र ७५.कजाग ७६.पावा ७७.यशस्वी ७९.खबरी ८०.रीसणे

उभे उत्तर : १.सावधान २.यम ३.कनक ४.अगळीवेगळी ६.नायनाट ७.लवंकर ८.यदाकदाचित ११.नाग १४.वारी १६.रंगीत १८.कदाचित २०.रजतपट २३.सवत २५.लडी २६.रंगहीन २८.परस्पर ३२.तलम ३४.मदतनीस ३५.गहिरा ३६.मना ४१.सनाथ ४२.वापर ४३.परतावणे ४५.रस्सी ४७.अंत ४९.मारा ५०.भट ५२.जरतर ५३.भूतकाळ ५४.नावडतीचे ५६.मकर ५७.कालहरण ५८.कसरत ६०अ. कीटक ६१.कावकाव ६२.परत ६५.बारीकसा ६६.कोजागरी ६८.रुपवान ६९.धनवान ७४.त्रयस्थ ७६.पाल ७८.स्वीय

# माळशेज रेल्वे मार्गाला तातडीची मंजूरी द्या

## खासदार नीलेश लंके यांचे रेल्वे मंत्र्यांना साकडे



**अहिल्यानगर : (समर्थ गांवकरी)**

माळशेज घाट-कल्याण (२४६ किमी) हा अत्यंत महत्त्वाचा नवीन रेल्वे मार्ग महाराष्ट्रातील मुंबई, पुणे आणि नाशिक या तीन प्रमुख विभागांना थेट जोडणारा ठरणार असून, राज्याच्या औद्योगिक व भौगोलिक विकासाला नवी दिशा देणारा ठरू शकतो. या प्रकल्पाला तात्काळ अंतिम मंजूरी व आर्थिक तरतूद करावी, अशी ठाम मागणी खासदार नीलेश लंके यांनी केंद्रीय रेल्वेमंत्री अश्विनी वैष्णव यांच्याकडे केली आहे.

गेल्या अनेक वर्षांपासून हा प्रकल्प प्रलंबित असल्याने प्रस्तावित लॉजिस्टिक्स कॉरिडॉरला मोठा फटका बसत आहे. सध्या मुंबई-नाशिक-मनमाड आणि पुणे-दौंड-अहिल्यानगर या मार्गांवर प्रचंड भार पडला असून, यामुळे मालवाहतूक खर्च वाढत आहे. परिणामी, उद्योगधंदे व गुंतवणूकदारांवरही प्रतिकूल परिणाम होत असल्याचे लंके यांनी पत्रात नमूद केले आहे.

मुंबई महानगर प्रदेश ते अहिल्यानगर-मराठवाडा- विदर्भ या भागांना जोडणारा सक्षम पर्यायी रेल्वे मार्ग सध्या उपलब्ध नाही. अशा परिस्थितीत अहिल्यानगर-माळशेज घाट-कल्याण हा मार्ग भारतीय रेल्वेसाठी तांत्रिकदृष्ट्या व्यवहार्य, आर्थिकदृष्ट्या फायदेशीर आणि दीर्घकालीन दृष्टिकोनातून उपयुक्त असल्याचे त्यांनी अधोरेखित केले आहे.

ना या रेल्वे मार्गामुळे छत्रपती संभाजीनगर-अहिल्यानगर-मुंबई-मराठवाडा-विदर्भ या पट्ट्यात वाहतूक सुलभ होईल.दिल्ली-मुंबई औद्योगिक कॉरिडॉरसाठी पूरक रेल्वे मार्ग उपलब्ध होईल. बंदरांशी निगडित मालवाहतुकीचा खर्च मोठ्या प्रमाणात कमी होईल. कृषी, निर्यात, एमएसएमई, पर्यटन आणि औद्योगिक क्षेत्राला चालना मिळेल. अहिल्यानगर-कल्याण तसेच कोकण प्रदेशाशी संपर्क अधिक गतिमान होईल.

या प्रकल्पासाठी आवश्यक सर्वेक्षण, व्यवहार्यता अभ्यास व तांत्रिक चाचण्या मोठ्या प्रमाणात पूर्ण झाल्या आहेत.

मात्र, अंतिम प्रशासकीय मंजूरी आणि निधी वाटपाचा टप्पा अद्याप प्रलंबित आहे.

महाराष्ट्र सरकार, उद्योग विभाग, एमआयडीसी आणि स्थानिक स्वराज्य संस्थांनीही सातत्याने या प्रकल्पाच्या जलद अंमलबजावणीची मागणी केली आहे. लंके यांनी २०२४ च्या संसद अधिवेशनातही हा मुद्दा उपस्थित केला होता.

### रेल्वे मंत्र्यांकडे पाच ठोस मागण्या

खासदार नीलेश लंके यांनी मंत्र्यांकडे केलेल्या मागण्यांमध्ये अहिल्यानगर-माळशेज घाट-कल्याण या नवीन रेल्वे मार्गाला तात्काळ अंतिम मंजुरी द्यावी, २०२५-२६ या आर्थिक वर्षात निधी वाटपाचा पहिला टप्पा त्वरित जाहीर करावा, माळशेज घाट बोगदा प्रकल्पाच्या डीपीआरला तांत्रिक समितीची मंजूरी देऊन अंतिम मान्यता द्यावी, या मार्गाचा 'विशेष रेल्वे प्रकल्प श्रेणी' मध्ये समावेश करावा. यांचा समावेश आहे.

# त्र्यंबकेश्वरच्या साधुग्रामचा आराखडा सादर करावा

**नाशिक : (समर्थ गांवकरी)**



आगामी कुंभमेळ्याच्या पार्श्वभूमीवर त्र्यंबकेश्वर येथील नियोजित साधुग्राम, गोदावरी नदीवरील घाट आणि डीपी रस्ता आणि त्याला जोडणाऱ्या जोड रस्त्यांचा आराखडा तत्काळ सादर करावा, असे निर्देश नाशिक त्र्यंबकेश्वर कुंभमेळा विकास प्राधिकरणाचे आयुक्त शेखर सिंह यांनी दिले. सिंहस्थ कुंभमेळा अंतर्गत साधुग्राम व पायाभूत सोयी सुविधांची पाहणी व आढावा बैठक शनिवारी दुपारी त्र्यंबकेश्वर नगर परिषदेच्या सभागृहात आयोजित करण्यात आली होती. त्यावेळी ते बोलत होते. यावेळी जिल्हाधिकारी आयुष प्रसाद, पोलिस अधीक्षक बाळासाहेब पाटील, उपविभागीय अधिकारी पवन दत्ता, सार्वजनिक बांधकाम विभागाचे कार्यकारी अभियंता राहुल पाटील, तहसीलदार गणेश जाधव, त्र्यंबकेश्वर नगरपरिषदेचे मुख्याधिकारी राहुल पाटील आदी उपस्थित होते.

आयुक्त श्री. सिंह म्हणाले की, नाशिक त्र्यंबकेश्वर येथे होणाऱ्या कुंभमेळ्याच्या माध्यमातून त्र्यंबकेश्वर शहर आणि परिसरातील पायाभूत सोयीसुविधांना प्राधान्य देण्यात येणार आहे. आगामी काळात भाविकांची वाढती संख्या लक्षात घेऊन पाणीपुरवठ्याचे नियोजन करून आराखडा तयार करावा. गोदावरी, अहिल्या, गौतमी नदीच्या स्वच्छतेबरोबर बारमाही प्रवाहित करण्यासाठी प्रयत्न केले जातील, असे नियोजन करावे.याबरोबर विकास कामांना गती द्यावी. त्र्यंबकेश्वर परिसरातील सर्व नद्या, तलाव यांची स्वच्छता करून सौंदर्यीकरण करावे. तलावांमधील गाळ काढण्यासाठी आराखडा तयार करावा. ठिकठिकाणी वृक्षारोपण करून परिसर हरित करण्यासाठी नगरपरिषदेने कार्यवाही करावी. विकास कामे गुणवत्तापूर्ण आणि दर्जेदार होतील याची दक्षता घ्यावी, असेही आयुक्त श्री. सिंह यांनी सांगितले.

# ठाण्यात सदनिकेच्या स्लॅबचे प्लास्टर कोसळून एकाचा मृत्यू तर २ जखमी

**ठाणे : (समर्थ गांवकरी)**

ठाण्यात सदनिकेच्या स्लॅबचे प्लास्टर पडल्यामुळे एकाचा दुर्दैवी मृत्यू तर २जण किरकोळ जखमी झाल्याची घटना घडली आहे. आज दिनांक १३ डिसें २०२५ रोजी पहाटे ३ वाजता मैत्री पार्क, लक्ष्मी पार्क फेज १ समोर, पाडा नंबर २, लोकमान्य नगर, ठाणे (प.) याठिकाणी करुमेदेव सोसायटी (तळ + ०७ मजली / १६ वर्षे जुने बांधकाम, एकूण ५३ रूम) या सोसायटीच्या टेरेस वरील रूम नं. ८०२ (मालक - श्रीमती. कलावती वर्मा, भाडेकरू: श्री. मनोज मोरे) या रूम मधील हॉलचे प्लास्टर पडले होते. सदर घटनास्थळी मा. आपत्ती व्यवस्थापन अधिकारी व सार्वजनिक बांधकाम विभागाचे कनिष्ठ अभियंता (लोकमान्य सावरकरनगर प्रभाग समिती),



अतिक्रमण विभागाचे कर्मचारी व आपत्ती व्यवस्थापन कक्षाचे कर्मचारी ०१- पिकअप वाहनासह उपस्थित झाले होते. सदर रूमचे प्लास्टर पडले तेव्हा सदर रूम मध्ये चार व्यक्ती झोपल्या होत्या त्यामधील अर्पिता मोरे ( वय ४१) व आयुष मोरे (वय १६) या व्यक्तींना किरकोळ दुखापत झाली असून त्यांना सिद्धिविनायक हॉस्पिटल, ठाणे येथे प्राथमिक उपचार करून डिस्चार्ज देण्यात आला तर सदर घटनेत मनोज मोरे (पु/४५ वर्ष) यांना छातीला दुखापत झाल्याने उपचारासाठी सिद्धिविनायक हॉस्पिटल ठाणे येथे दाखल केले असता डॉक्टरांनी त्यांना मृत घोषित केले आहे व पुढील कार्यवाही वर्तक नगर पोलीस यांच्यामार्फत सुरू आहे.

# Vivo X300 सिरीज आणि नॅशनल जिओग्राफिक क्रिएटिव्ह वर्क्स सहयोग करतात

**नवी दिल्ली : (समर्थ गांवकरी)**

Vivo ने आज नॅशनल जिओग्राफिक क्रिएटिव्ह वर्क्स सोबतच्या त्यांच्या नवीन सहकार्याची घोषणा केली, "गो इनटू द वाइल्ड", हा एक इमर्सिव्ह फोटोग्राफी आणि स्टोरीटेलिंग उपक्रम आहे जो पूर्णपणे नवीन Vivo X300 सिरीजवर चित्रित केला गेला आहे. मागील आवृत्तीच्या यशानंतर, या वर्षीचा प्रकल्प नॅट जिओ एक्सप्लोरर आणि देशभरातील निर्माते आणि छायाचित्रकारांना भारताच्या वन्य भूप्रदेशात घेऊन जातो.

# मिरजगावात कॅनलमध्ये पडलेला बिबट्या पकडण्यासाठी ऑपरेशन

- तब्बल सहा तासांच्या प्रयत्नांनंतर बिबट्या जेरबंद
- नागरिकांनी सोडला सुटकेचा निःश्वास

**कर्जत : (समर्थ गांवकरी)**

गेली आठ दिवसांपासून मिरजगाव शहरालगत असलेल्या गुरवपिंप्री रोड, खेतमाळस मळा या परिसरात नागरिकांना बिबट्या दिसल्याने या भागात बिबट्याचा वावर असल्याची नागरिकांमधून चर्चा होती. आणि याबाबत वनविभागाला कळविण्यात आले होते. त्यावेळी वनविभागाकडून या परिसरात बिबट्या नसून तरस असल्याचे सांगण्यात आले होते. मात्र, बिबट्या आल्याने या भागातील नागरिकांमध्ये भितीचे वातावरण होते.

त्यानंतर या परिसरात असलेल्या मिरजगावातील गोरे मळानजीक कॅनलमध्ये शनिवार,



दि.१३ डिसेंबर रोजी मध्यरात्रीच्या सुमारास एक मादी बिबट्या अंदाजे वय दोन ते अडीच वर्ष हा पाण्याच्या डबक्यात पडलेल्या अवस्थेत आढळून आला. सकाळी हे येथील नागरिकांच्या निदर्शनास आले असताना त्यांनी तात्काळ वनविभागाला याबाबत माहिती दिली. बिबट्या कॅनलच्या पाण्याच्या डबक्यात पडल्याची वार्ता मिरजगाव व परिसरात वा-यासारखी पसरली. बिबट्याला पाहण्यासाठी त्याठिकाणी नागरिकांनी मोठी गर्दी केली होती.

या दरम्यान, वनपरिक्षेत्र कर्जत(प्रा.), रेस्कु टिम दौंड, वनपरिक्षेत्र मा.प.अ.मिरजगांव व वनपरिक्षेत्र श्रीगोंदा(प्रा.) यांनी संयुक्तरित्या रेस्क्यू ऑपरेशन राबविण्यात आले. बिबट्याला सुरक्षित बाहेर काढण्यासाठी सकाळी ८ वाजेपासून दुपारी २ वाजेपर्यंत जाळी टाकून तब्बल सहा तासांच्या प्रयत्नांनंतर अखेर मादी बिबट्याला पिंजऱ्यात जेरबंद करण्यात वनविभागाला यश आले. त्यानंतर नागरिकांनी सुटकेचा निःश्वास सोडला.

मादी बिबट्याला जेरबंद करण्यासाठी जे रेस्क्यू ऑपरेशन करण्यात आले, त्यात वनविभागाचे २१ कर्मचारी व स्थानिक पोलिस यांचा सहभाग होता. जेरबंद करण्यात आलेल्या बिबट्याला निगराणी खाली ठेवण्यात आले आहे. रेस्क्यू ऑपरेशन दरम्यान वनपरिक्षेत्र अधिकारी मोहन शेळके, संकेत ऊगले यांचे मार्गदर्शनाखाली वनपाल प्रविण सोनवणे, सचिन गांगर्डे सह वनरक्षक सुरेश भोसले, रवि राठोड, सागर वाघचौरे, शांतिनाथ सपकाळ, चंद्रकांत मरकड, नागेश तेलंगे, गंगासागर गोटमुकले, चित्रा शिंदे, घोडके मॅडम, किसन नजन, किसन बोबडे, ऋषिकेश लोखंडे, माळशिखरे, महारनवर, सुर्यवंशी यांनी महत्त्वाची भूमिका पार पाडली.

# नियमबाह्य औषध विक्री करणाऱ्या डी अँड जी फार्मावर धडक कारवाई

## परवाना रद्द, शहरात खळबळ

**देगलुर : (समर्थ गांवकरी)**

देगलूर नगरपालिका कॉम्प्लेक्समधील डी अँड जी फार्मा या औषध विक्री केंद्रावर औषध प्रशासन विभागाने धडक कारवाई करत परवाना रद्द करण्याचा कठोर निर्णय घेतला असून या आदेशाने शहरातील औषध विक्री व्यवसायात मोठी खळबळ उडाली आहे.

तक्रारदार गजानन प्रकाश ढगे यांच्या तक्रारीनंतर सहायक आयुक्त (औषधे) अ. तू. राठोड यांनी २६ ऑगस्ट २०२५ रोजी केलेल्या तपासणीत गंभीर अनियमितता उघड झाल्याने ही कारवाई अपरिहार्य ठरली. परवाना धारकांनी ४ सप्टेंबरला दिलेले स्पष्टीकरण तथ्यहीन आणि समाधानकारक नसल्याचे आदेशात स्पष्ट करण्यात आले आहे.

तपासणीत डॉक्टरांच्या चिठ्ठीशिवाय औषध विक्री, मुदतबाह्य औषधांचा व्यवहार, बिलिंगमध्ये चुकीचे बॅच क्रमांक, दुकानात परवाना प्रदर्शित न करणे, तपासणी नोंद वही उपलब्ध नसणे, तसेच Tramadol आणि Pregabalin सारख्या नियंत्रणाधीन औषधांच्या साठ्यात मोठी तफावत अशा गंभीर त्रुटी आढळल्या.

भागीदारी बदलाची कायदेशीर नोंद न करणे आणि शेड्यूल H-1 औषधांचे अपूर्ण रेकॉर्डही नियमभंगात मोडल्या. संगणकातील बिघाड किंवा ग्राहकांची गर्दी ही कारणे प्रशासनाने दिशाभूल करणारी ठरवत फेटाळून लावली आहेत.

या पार्श्वभूमीवर परवाना क्रमांक MH-NAN-461280




आणि MH-NAN-461281 हे २१ डिसेंबर २०२५ पासून रद्द मानण्याचा आदेश देण्यात आला आहे. त्या नंतर दुकानात कोणतीही औषध खरेदी-विक्री, साठा ठेवणे किंवा औषधे प्रदर्शित करणे हे कायद्याच्या कलम १८(सी) नुसार थेट गुन्हा ठरणार आहे. संबंधितांना पुढील तीन महिन्यांत मा. अन्न व औषध प्रशासन मंत्री, मंत्रालय मुंबई येथे अपील करण्याची संधी उपलब्ध आहे.

शहरात काही दिवसांपासून डी अँड जी फार्मामधील नियमबाह्य औषध विक्रीबाबत चर्चा रंगत होती. त्यातच परवाना रद्दीची कारवाई होताच नागरिकांत भीतीचे तर औषध विक्रेत्यांमध्ये चिंतेचे वातावरण निर्माण झाले आहे. देगलूरमध्ये या प्रकरणामुळे औषध व्यवसायातील प्रामाणिकपणावर मोठे प्रश्नचिन्ह उभे राहिले आहे.

# प्रदर्शनात प्रथम क्रमांक

**जुन्नर तालुका: (समर्थ गांवकरी)**

पुणे जिल्हा परिषद व पंचायत समिती जुन्नर, जुन्नर तालुका माध्य.व उच्च माध्य. शाळामुख्याध्यापक संघ यांचे संयुक्त विद्यमाने आयोजित जुन्नर तालुका स्तरीय विज्ञान व गणितीय प्रदर्शन सन २०२५/२६ दि:- १२ व १३ डिसेंबर २०२५ रोजी समर्थ कॉलेज बेल्हे ता:-जुन्नर येथे संपन्न झाले या प्रदर्शना मध्ये भाऊसाहेब बोरा आणे माळशेज माध्य.व उच्च माध्य. विद्यालय, मढ ता:-जुन्नर येथील इयत्ता ९ वी ते १२ वी आदिवासी गटात कु शुभम पानसरे व कु नील शहा इयत्ता ९ वी या विद्यार्थ्यांने तयार केलेल्या इस्राईल शेती ( टेरेस शेती )या मॉडेलला प्रथम क्रमांक मिळाला असून जिल्हा स्तरासाठी निवड झालेली आहे . या विद्यार्थ्यांना आहेर सर,मोढवे सर, महाले मॅडम,राणे मॅडम या विज्ञान शिक्षकांनी मार्गदर्शन केले.

# कंधारात सूर्यपुत्र भैय्यासाहेब आंबेडकरांना अभिवादन

**कंधार : (समर्थ गांवकरी)**

चैत्यभूमीचे शिल्पकार, बौद्धाचार्यांचे जनक, भारतीय बौद्ध महासभेचे द्वितीय अध्यक्ष, पीपल्स एज्युकेशन सोसायटी मुंबईचे ट्रस्टी, बौद्धजन पंचायत समितीचे सभापती, माजी आमदार, सूर्यपुत्र भैय्यासाहेब तथा यशवंतराव भिमराव आंबेडकर यांच्या ११३ व्या जयंतीनिमित्त भीमगड येथील अस्थी स्मारक, कंधार येथे भारतीय बौद्ध महासभा ता. शाखा, कंधारच्या वतीने विनम्र अभिवादन करण्यात आले.

कार्यक्रमाच्या प्रारंभी भैय्यासाहेब आंबेडकर यांच्या अस्थी स्मारकाला व प्रतिमेला पुष्पहार अर्पण करून विनम्र अभिवादन करण्यात आले. त्यानंतर भारतीय बौद्ध महासभेचे तालुकाध्यक्ष जितेंद्र ढवळे यांच्या हस्ते धम्म ध्वजारोहण करण्यात आले. यावेळी समता सैनिक दलाने सलामी दिल्यानंतर. सामूहिक त्रिशरण आणि पंचशील ग्रहण



करण्यात आले. यावेळी माजी नगराध्यक्ष रामराव पवार, माजी नगरसेवक डॉ.दिपक बडवणे, भारतीय बौद्ध महासभेचे जिल्हा संघटक विलास कांबळे, सेवानिवृत्त मुख्याध्यापक सुधाकर सोनकांबळे, सेवानिवृत्त मुख्याध्यापक शेषेराव वाघमारे, मुख्याध्यापक सी.डी. कांबळे, अंकुर युवा प्रतिष्ठानचे अध्यक्ष प्रदीप पांगरीकर, अशोका बहुउद्देशीय सेवाभावी संस्थेचे अध्यक्ष आनंदराव टुंडे, भारतीय बौद्ध महासभेचे माजी तालुकाध्यक्ष आर.एन. गायकवाड, मेजर संतोष दुडे, समता सैनिक दलाचे विलास सोनकांबळे, बी.सी. कांबळे,चालक मालक वाहन महासंघाचे तालुकाध्यक्ष माधव कांबळे, दिलीप देशमुख, नामदेव कांबळे,आनंदराव कांबळे,पांडुरंग सोनकांबळे, जळबा ढवळे,प्रकाश ढवळे, विलास ढवळे, जळबा ढवळे, राणी ढवळे, नंदा भालेराव, करुणा वाघमारे, सुमनबाई दुंडे यांच्यासह उपासक उपासिका बालक-बालिकांची उपस्थिती होती.

# पिस्तूल काडतुस सह आरोपी ग्रामीण पोलिसांच्या ताब्यात



**नांदेड : (समर्थ गांवकरी)**

नांदेड ग्रामीण पोलीस ठाण्याच्या गुन्हे शोध पथकाने केलेल्या कारवाईत दि १२ डिसेंबर रोजी बोंढार बायपास मार्गावर गावठी पिस्तूल व जिवंत काडतूस बाळगणाऱ्या आरोपीस अटक केली असून, त्यांच्याकडून पिस्टल व जिवंत काडतुस जप्त केले. नांदेडचे जिल्हा पोलिस अधीक्षक अबिनाश कुमार यांनी सूरू केलेल्या स्ट्रीट सेफ्टी मोहिमेअंतर्गत उपविभागीय पोलिस अधिकारी प्रशांत शिंदे, नांदेड ग्रामीण पोलीस ठाण्याचे पोलिस निरीक्षक ओमकांत चिंचोलकर यांच्या मार्गदर्शनाखाली दि १२ डिसेंबर रोजी गुन्हे शोध पथकाचे पोलिस उप निरीक्षक ज्ञानेश्वर मटवाड व त्यांचे पथक पेट्रोलींग करीत असताना त्यांना बोंढार बायपास मार्गाकडे येणाऱ्या कांदा मार्केट मार्गावर गंभीर दुखापतीच्या गुन्हयातील आरोपी हा विनापरवाना गावठी पिस्तूल व जिवंत काडतुस विक्री करण्याच्या उद्देशाने सोबत घेऊन थांबला असल्याची माहिती मिळाली.या माहितीवरून पथकाने सापळा रचुन इसम शेख समी उर्फ अरबाज शेख रउफ वय २४ रा. असद मदनी कॉलनी मदनी मस्जीद जवळ देगलूर नाका यास ताब्यात घेवून त्याची अंगझडती घेतली.

# कुस्ती, पशु व कृषी स्पर्धांच्या बक्षिसात भरीव वाढ : आमदार चिखलीकर

## कलावंतांचा सन्मान करण्यात येणार यात्रेत स्वच्छतेवर भर

**नांदेड जिल्हा : (समर्थ गांवकरी)**

दक्षिण भारतातील ग्रामीण भागात भरणाऱ्या मोठ्या यात्रांपैकी एक असलेल्या श्री क्षेत्र माळेगाव येथील श्री खंडोबा यात्रेचे वैभव अधिक वाढविण्यासाठी यावर्षी कुस्ती, कृषी व पशु स्पर्धांच्या बक्षीस रकमेत भरीव वाढ करण्यात आली आहे, अशी माहिती आमदार चिखलीकर यांनी दिली.

माळेगाव येथे आज आमदार चिखलीकर यांच्या अध्यक्षतेखाली यात्रेच्या पूर्वतयारीसंदर्भात आढावा बैठक पार पडली. यावेळी ते बोलत होते. बैठकीस जिल्हा परिषदेच्या मुख्य कार्यकारी अधिकारी मेघना कावली, अतिरिक्त पोलीस अधीक्षक सूरज गुरव, उपविभागीय अधिकारी नरवटे, उपविभागीय पोलीस अधिकारी अश्विनी जगताप, जिल्हा ग्रामीण विकास यंत्रणेचे प्रकल्प संचालक डॉ. संजय तुबाकले, उपमुख्य कार्यकारी अधिकारी राजकुमार मुक्कावार, यात्रा सचिव डी.बी. गिरी, अभियंता राहुल रावसाहेब, जिल्हा आरोग्य अधिकारी डॉ. संगीता देशमुख, पशुसंवर्धन उपायुक्त डॉ. राजकुमार पडीले, जिल्हा कृषी अधिकारी डॉ. निलकुमार ऐतवडे, गटविकास अधिकारी कुलकर्णी आदी उपस्थित होते.

यंदा कुस्ती, कृषी आणि पशुसंवर्धन विभागाच्या स्पर्धांसाठी जवळपास ५० लाख रुपयांची वाढीव तरतूद करण्यात आली आहे. कृषी विभागाच्या फळपिके व मसाला पिक स्पर्धेत गटात प्रथम बक्षीस ७ हजार, द्वितीय ६ हजार, तृतीय ५ हजार रुपये तसेच उत्तेजनार्थ बक्षीस देण्यात येणार आहे. पशुसंवर्धन विभागात लाल कंधारी ब्रिड चॅम्पियन नर व मादी गटासाठी प्रत्येकी १ लाख २१ हजार रुपये, देवणी नर व मादी गटासाठी प्रत्येकी ७१ हजार रुपये तसेच लाल कंधारी स्पर्धेत नर व मादी गटासाठी प्रत्येकी ५१ हजार रुपये बक्षीस ठेवण्यात आले आहे. या विभागासाठी एकूण ११ लाख रुपयांची वाढ करण्यात आली आहे असे आमदार चिखलीकर यांनी सांगितले.

माळेगाव यात्रा कुस्तीसाठी प्रसिद्ध असून, यंदा कुस्ती स्पर्धेच्या बक्षिसात प्रत्येकी १० हजार रुपयांची वाढ करण्यात आली आहे. प्रथम क्रमांकासाठी ६१ हजार, द्वितीय ५१ हजार, तर तृतीय ४१ हजार रुपये बक्षीस दिले जाणार आहे. लोकनाट्य मंडळांना प्रत्येकी ७१ हजार रुपये प्रोत्साहनपर रक्कम दिली जाणार आहे. शंकरपट स्पर्धेत प्रथम ६१ हजार, द्वितीय ५१ हजार, तृतीय ४१ हजार रुपये पारितोषिक जाहीर करण्यात आले आहे.

यात्रेदरम्यान येणाऱ्या विविध कलावंतांचा सन्मान करण्यात येणार असून, यात्रा प्लास्टिकमुक्त व स्वच्छ ठेवण्यासाठी प्रशासन व ग्रामपंचायतींनी विशेष प्रयत्न करावेत, असे आवाहन त्यांनी केले.

माळेगाव यात्रेसाठी दरवर्षी जिल्हा परिषदेला २ कोटी रुपयांचा निधी मिळावा, यासाठी राज्याचे मुख्यमंत्री यांच्याकडे मागणी करण्यात आली असून, मुख्यमंत्री, उपमुख्यमंत्री, पालकमंत्री व इतर मंत्र्यांना यात्रेचे निमंत्रण देण्यात आल्याची माहिती आमदार चिखलीकर यांनी दिली. यात्रेच्या नियोजनाबाबत माहिती देताना त्यांनी सांगितले की, वीजपुरवठा व पाणीपुरवठा सुरू असून आमदार निधीतून दोन डीपी, २५ पोल व हायमास्ट दिवे बसविण्यात आले आहेत. सीसीटीव्ही कॅमेऱ्यांची संख्या वाढविण्यात आली आहे. तलाव फुटल्यामुळे टँकरद्वारे पाणीपुरवठा करण्याचे निर्देश देण्यात आले आहेत. यात्रेदरम्यान कडेकोट पोलीस बंदोबस्त, आरोग्य सुविधा व स्वच्छतेची विशेष व्यवस्था करण्यात येणार आहे. शालेय विद्यार्थ्यांना माळेगाव यात्रेचे महत्त्व समजावे यासाठी जिल्हाभरातील शाळांच्या सहली आयोजित करण्याच्या सूचनाही आमदारांनी दिल्या. यावेळी मुख्य कार्यकारी अधिकारी मेघना कावली यांनी यात्रेच्या नियोजनाची माहिती देताना सांगितले की, यंदा सीसीटीव्ही कॅमेरे वाढविण्यात आले असून तलाव परिसरात सहा जीव रक्षकांची नेमणूक करण्यात आली आहे. पाणीपुरवठा, आरोग्य सेवा तसेच सहा फिरती व दहा दुरुस्त केलेली सार्वजनिक शौचालये उपलब्ध करून देण्यात येणार आहेत. यात्रेचे आयोजन सुरळीत पार पाडण्यासाठी नागरिकांनी प्रशासनाला सहकार्य करावे, असे आवाहन त्यांनी केले. कार्यक्रमाचे प्रास्ताविक उपमुख्य कार्यकारी अधिकारी तथा यात्रा सचिव डी.बी. गिरी यांनी केले. या बैठकीला विविध खात्यांचे विभाग प्रमुख, मंदिर समिती व ग्रामपंचायत पदाधिकारी आदींची उपस्थिती होती.

# पत्रकारांच्या विविध मागण्यांचे निवेदन मंत्रिमंडळाला सादर!














**नागपूर : (समर्थ गांवकरी)**

महाराष्ट्र राज्यातील पत्रकारांच्या प्रलंबित व महत्त्वाच्या मागण्यांसंदर्भात महाराष्ट्र राज्य पत्रकार संघ, मुंबई यांच्या वतीने मान्यवर मंत्री महोदयांना सविस्तर निवेदन सादर करण्यात आले. या निवेदनाद्वारे पत्रकारांच्या सामाजिक, आर्थिक व व्यावसायिक सुरक्षिततेसाठी आवश्यक असलेल्या विविध मागण्यांकडे शासनाचे लक्ष वेधण्यात आले. या महत्त्वपूर्ण प्रसंगी महाराष्ट्र राज्याचे मुख्यमंत्री माननीय श्री. देवेंद्रजी फडणवीस यांच्यासह जलसंपदा तथा पालकमंत्री ना. राधाकृष्ण विखे पाटील, महसूल मंत्री ना. चंद्रशेखर बावनकुळे, उद्योग मंत्री ना. उदय सामंत, औषध निर्माण मंत्री ना. नरहरी झिरवाळ, क्रीडा मंत्री माणिकराव कोकाटे, दुग्धविकास मंत्री अतुल सावे, सहकार मंत्री पंकज भोईर, ऊर्जामंत्री मेघना बोर्डीकर, आरोग्यमंत्री प्रकाश आबिटकर यांची प्रमुख उपस्थिती होती. तसेच शिवसेना (उद्धव बाळासाहेब ठाकरे) पक्षाचे विधानमंडळ गटनेते आमदार मा. श्री. आदित्य ठाकरे, आमदार गोपीचंद पडळकर, आमदार अमोल खताळ, आमदार विठ्ठलराव लंघे, सामाजिक कार्यकर्त्या सुषमा अंधारे, ज्येष्ठ संपादक प्रकाश पोहरे यांचाही कार्यक्रमाला उपस्थित राहून पत्रकारांच्या प्रश्नांबाबत सकारात्मक भूमिका मांडली.

या कार्यक्रमास महाराष्ट्र राज्याचे माहिती महासंचालक ब्रिजेश सिंग मिश्रा यांनी विशेष उपस्थिती लावून कार्यक्रमाला अधिक महत्त्व प्राप्त करून दिले. निवेदन सादर करताना ऑल इंडिया जर्नालिस्ट असोसिएशन, दिल्लीचे राष्ट्रीय अध्यक्ष अशोक वानखेडे, महाराष्ट्र राज्य पत्रकार संघाचे राज्य संघटक संजय भोकरे, राज्य सरचिटणीस सिद्धार्थ भोकरे, दैनिक समर्थ गांवकरीचे संपादक व राज्य सरचिटणीस डॉ. विश्वासराव आरोटे, जिल्हा प्रसिद्धी प्रमुख भाऊसाहेब वाकचौरे, विदर्भ प्रमुख अनुप भार्गव, प्रदीप शेंडे तसेच दैनिक समर्थ गांवकरीचे महाव्यवस्थापक संजय फुलसुंदर हे सर्व मान्यवर उपस्थित होते.

यावेळी पत्रकार संरक्षण कायदा प्रभावी अंमलबजावणी, आरोग्य विमा, निवास सुविधा, मानधन, ज्येष्ठ पत्रकारांसाठी विशेष योजना तसेच डिजिटल व ग्रामीण पत्रकारांच्या प्रश्नांबाबत सविस्तर चर्चा करण्यात आली. मंत्रीमहोदयांनी पत्रकार संघाच्या मागण्यांकडे सकारात्मक दृष्टीने पाहण्याचे आश्वासन देत लवकरच योग्य निर्णय घेतला जाईल, अशी ग्वाही दिली. या निवेदनामुळे पत्रकारांच्या हक्कांसाठी एक मजबूत पाऊल उचलले गेले असून, शासन व पत्रकार संघटनांमध्ये समन्वयातून सकारात्मक बदल घडून येतील, असा विश्वास उपस्थित मान्यवरांनी व्यक्त केला.

## वीवो स्विच ऑफ स्टडी बनली आहे भारतीय कुटुंबांची पसंती




**नवी दिल्ली : (समर्थ गांवकरी)**

वीवो इंडियाने आज त्यांच्या वार्षिक स्विच ऑफ अहवालाची सातवी आवृत्ती प्रसिद्ध केली, जी पालक-मुलांच्या संबंधांवर स्मार्टफोनचा अतिरेकी वापर कसा परिणाम करत आहे हे समजून घेण्याचा प्रयत्न करते. या वर्षीच्या आवृत्तीत विवोच्या 'स्विच ऑफ' उपक्रमाचे मुख्य उद्दिष्ट आणखी दृढ केले आहे - लोकांना त्यांच्या स्मार्टफोनशी निरोगी संबंध विकसित करण्यास आणि वास्तविक जीवनातील नातेसंबंधांना प्राधान्य देण्यास प्रोत्साहित करणे. हा अहवाल एका मोठ्या 'स्विच ऑफ' उपक्रमाचा भाग आहे जो प्रियजनांसोबत अधिक वेळ घालवण्याचे महत्त्व अधोरेखित करतो. डिजिटल कनेक्टिव्हिटी दैनंदिन जीवनाचा एक मोठा भाग बनत असताना कुटुंबे या बदललेल्या डिजिटल वर्तनाशी कसे जुळवून घेत आहेत याचा शोध अहवालात घेतला आहे. अभ्यासातून दोन प्रमुख अंतर्दृष्टी समोर आल्या आहेत: रात्रीच्या जेवणाचा वेळ कुटुंबांसाठी दिवसाचा सर्वोत्तम कनेक्शन क्षण राहिला आहे आणि मुले आता मदतीसाठी एआयकडे वळत आहेत कारण त्यांना वाटते की त्यांचे पालक अनेकदा खूप व्यस्त असतात.

अभ्यासातून असे दिसून आले आहे की ७२% मुले रात्रीच्या जेवणाच्या वेळी त्यांच्या पालकांसोबत सर्वाधिक वेळ घालवतात. ९१% मुले म्हणतात की फोन बाजूला ठेवल्यावर संभाषण सोपे आणि अर्थपूर्ण वाटते, ज्यामुळे रात्रीच्या जेवणाची वेळ एक नैसर्गिक जागा बनते जिथे कुटुंबाचे लक्ष केंद्रित होते आणि प्रत्येकजण पुन्हा जोडलेला वाटतो. सुदैवाने, अभ्यासातून असे दिसून आले आहे की कुटुंबे आता हे सामायिक क्षण पुन्हा तयार करण्यास तयार आहेत. पालक आणि मुले सूचना कमी करणे.



## धोंडीभाऊ देवराम डोके यांचे निधन

**शिवनेरी: (समर्थ गांवकरी)**

कुमशेत येथील जिल्हा परिषद प्राथमिक शाळा माजी सदस्य धोंडीभाऊ देवराम डोके वय ६४ वर्ष यांचे निधन झाले आहे. यांच्या पाठीमागे पत्नी दोन मुले, मुलगी, जावाई , भाऊ, भावजय , पुतणे , सुना ,नातवंडे असा मोठा परिवार आहे. शिरोली बुद्रुक कृषक सेवा सहकारी सोसायटी माजी संचालक देवराम भागुजी डोके यांचे ज्येष्ठ पुत्र होते.

### राधाकृष्ण विखे पाटील यांच्या हस्ते

## 'दैनिक समर्थ गांवकरी' दिवाळी अंकाचे दिमाखदार प्रकाशन!



**नागपूर : (समर्थ गांवकरी)**

नागपूर येथे सामाजिक भान, ग्रामीण विकास आणि प्रबोधनात्मक लेखनासाठी ओळख असलेल्या 'दैनिक समर्थ गांवकरी'च्या दिवाळी अंकाचा भव्य प्रकाशन सोहळा राज्यातील मान्यवरांच्या उपस्थितीत उत्साहात पार पडला. जलसंपदा तथा पालकमंत्री ना. राधाकृष्ण विखे पाटील यांच्या हस्ते या दिवाळी अंकाचे औपचारिक प्रकाशन करण्यात आले. या प्रसंगी नागपूरच्या साहित्यिक व पत्रकारितेच्या वातावरणात नवचैतन्य निर्माण झाल्याचे चित्र दिसून आले. कार्यक्रमाला पत्रकार संघटनांकडून उत्स्फूर्त प्रतिसाद लाभला. ऑल इंडिया जर्नालिस्ट असोसिएशन, दिल्लीचे राष्ट्रीय अध्यक्ष अशोक वानखेडे, महाराष्ट्र राज्य पत्रकार संघाचे राज्य संघटक संजय भोकरे, राज्य सरचिटणीस सिद्धार्थ भोकरे, 'दैनिक समर्थ गांवकरी'चे संपादक व राज्य सरचिटणीस डॉ. विश्वासराव आरोटे, जिल्हा प्रसिद्धी प्रमुख भाऊसाहेब वाकचौरे, विदर्भ प्रमुख अनुप भार्गव, प्रदीप शेंडे तसेच महाव्यवस्थापक संजय फुलसुंदर यांची प्रमुख उपस्थिती होती. यंदाच्या दिवाळी अंकात ग्रामीण विकास, शेती, सामाजिक परिवर्तन, जलव्यवस्थापन, उद्योगक्षेत्र, सांस्कृतिक वारसा आणि समकालीन विषयांवरील दर्जेदार व अभ्यासपूर्ण लेखांचा समृद्ध संग्रह वाचकांसाठी सादर करण्यात आला आहे. प्रकाशनानंतर झालेल्या चर्चासत्रात मंत्री, पत्रकार व संपादकांनी ग्रामीण पत्रकारितेचे वाढते महत्त्व, शासन–माध्यम समन्वय तसेच मूल्याधिष्ठित पत्रकारितेची आजच्या काळातील गरज यावर सखोल विचार मांडले. सुयोग्य नियोजन, प्रभावी संयोजन आणि मान्यवरांची मोठी उपस्थिती यामुळे 'दैनिक समर्थ गांवकरी' दिवाळी अंकाचा प्रकाशन सोहळा यंदा विशेष गाजला असून, या अंकाने ग्रामीण वाचकांपर्यंत सकारात्मक विचार आणि विकासाभिमुख दृष्टी पोहोचवण्याचे महत्त्वपूर्ण कार्य केल्याचे मत उपस्थितांनी व्यक्त केले.

## सक्रा वर्ल्ड हॉस्पिटलने अत्याधुनिक पार्किन्सन रोग क्लिनिकचे केले उद्घाटन



**पुणे : (समर्थ गांवकरी)**

भारतातील पहिले 100% एफडीआय-वित्तपोषित रुग्णालय आणि न्यूरोसायन्सेस क्षेत्रातील अग्रणी असलेल्या सक्रा वर्ल्ड हॉस्पिटलने आज आपल्या पार्किन्सन रोग क्लिनिकच्या उद्घाटनाची घोषणा केली. पार्किन्सन रोग आणि इतर मूव्हमेंट डिसऑर्डर्सने ग्रस्त रुग्णांसाठी प्रगत निदान, वैयक्तिकृत उपचार आणि समग्र पुनर्वसन सेवा देण्यासाठी हे समर्पित, बहुवैद्यकीय केंद्र स्थापन करण्यात आले आहे.

या अत्याधुनिक क्लिनिकचे औपचारिक उद्घाटन श्री युईची नागानो, मॅनेजिंग डायरेक्टर; श्री के. ई. इयामा, डेप्युटी मॅनेजिंग डायरेक्टर; आणि श्री लवकेश कुमार फासू, ग्रुप चीफ ऑपरेटिंग ऑफिसर, सक्रा वर्ल्ड हॉस्पिटल, बेंगळुरू यांच्या हस्ते करण्यात आले. यावेळी प्रमुख पाहुणे म्हणून डॉ. प्रशांत एल. के., मूव्हमेंट डिसऑर्डर सोसायटी ऑफ इंडिया (MDSI) चे संस्थापक सदस्य, तसेच डॉ. हेम कृष्णा पी., कन्सल्टंट – न्यूरोलॉजी, पार्किन्सन रोग व मूव्हमेंट डिसऑर्डर्स, सक्रा वर्ल्ड हॉस्पिटल, बेंगळुरू उपस्थित होते.

या क्लिनिकने विशेष पार्किन्सन केअर पॅकेजेस देखील सुरू केली आहेत, जी रोगाच्या प्रत्येक टप्प्यावर रुग्णांना सुलभ आणि सातत्यपूर्ण उपचार देण्यासाठी तयार करण्यात आली आहेत.

या उपक्रमावर भाष्य करताना श्री युईची नागानो, मॅनेजिंग डायरेक्टर, सक्रा वर्ल्ड हॉस्पिटल म्हणाले:

"या विशेष क्लिनिकचे उद्घाटन न्यूरोसायन्सेसमध्ये जागतिक दर्जाचे मानदंड पुरवण्याच्या सक्राच्या ध्येयाचे प्रतीक आहे. भारतातील वृद्ध होत चाललेल्या लोकसंख्येमध्ये पार्किन्सन रोगाचा वाढता प्रसार लक्षात घेता, आमचे समग्र व सहकार्यात्मक केअर मॉडेल रुग्ण व त्यांच्या कुटुंबांच्या जीवनमानात लक्षणीय सुधारणा घडवून आणेल."

या कार्यक्रमात सक्रा वर्ल्ड हॉस्पिटलमधील प्रमुख क्लिनिकल तज्ज्ञांचा पॅनेल सहभागी झाला. यामध्ये डॉ. अर्जुन श्रीवत्स, डायरेक्टर व एचओडी, इन्स्टिट्यूट ऑफ ब्रेन अँड स्पाइन; डॉ. अमित कुलकर्णी, सीनियर कन्सल्टंट व लीड – न्यूरोलॉजी व स्ट्रोक; डॉ. हेम कृष्णा पी.; डॉ. आलोक मोहन उप्पार; डॉ. महेश्वरप्पा बी. एम., डायरेक्टर व हेड, सक्रा इन्स्टिट्यूट ऑफ रिहॅबिलिटेशन सायन्सेस; तसेच डॉ. श्वेता कडाबा, न्यूरोसायकॉलॉजिस्ट, सक्रा वर्ल्ड हॉस्पिटल यांचा समावेश होता.

## मूत्रविज्ञान शस्त्रक्रिया यशस्वी

**पिंपरी, पुणे : (समर्थ गांवकरी)**

मेडिकव्हर KLE हॉस्पिटल, पिंपरी येथे 93 वर्षीय पद्माकर दिनकर उबाळे यांच्यावर यशस्वीरीत्या एक अतिशय गुंतागुंतीची मूत्रविज्ञान शस्त्रक्रिया करण्यात आली. तब्बल 50 वर्षे वाढत असलेला आणि तब्बल 1.6 किलो वजनाचा स्क्रोटल मास काढण्यात डॉक्टरांना यश मिळाले असून, रुग्णाला उपचारानंतर सुरक्षितरीत्या डिस्चार्ज देण्यात आला आहे. उबाळे यांना 23 नोव्हेंबर 2025 रोजी हॉस्पिटलमध्ये दाखल करण्यात आले होते. जवळपास 50 वर्षांपासून हळूहळू वाढत चाललेल्या स्क्रोटल सूजेसह दोन्ही पायांमध्ये सूज व वारंवार लघवी होण्याची तक्रार ते करत होते. तपासणीदरम्यान उजव्या बाजूला 20x20x15 सेंमी एवढा मोठा स्क्रोटल मास आढळला, ज्याचे वजन अंदाजे 1.6 किलो होते.

## पत्रकारांच्या मागण्यांवर सकारात्मक चर्चा; आदित्य ठाकरे यांनी अधोरेखित केले पत्रकारांचे महत्त्व!



**नागपूर : (समर्थ गांवकरी)**

शिवसेना उद्धव बाळासाहेब ठाकरे पक्षाचे विधानमंडळ गटनेते आमदार मा. श्री. आदित्य ठाकरे यांची महाराष्ट्र राज्य पत्रकार संघाचे राज्य सरचिटणीस तथा दैनिक समर्थ गांवकरीचे संपादक डॉ. विश्वासराव आरोटे यांनी नागपूर येथे सदिच्छा भेट घेतली. या भेटीदरम्यान राज्यातील पत्रकारांच्या विविध प्रलंबित मागण्या, समस्या व अपेक्षांवर सविस्तर आणि सकारात्मक चर्चा झाली. डॉ. विश्वासराव आरोटे यांनी पत्रकारांच्या सामाजिक सुरक्षितता, मानधन, आरोग्य सुविधा, निवास व कार्यपरिस्थितीशी संबंधित मुद्दे मांडले. त्यावर आमदार आदित्य ठाकरे यांनी पत्रकारांचे लोकशाहीतील योगदान अत्यंत महत्त्वाचे असल्याचे नमूद करत, या मागण्यांकडे सकारात्मक दृष्टीने पाहिले जाईल, असा आश्वासक प्रतिसाद दिला. लोकशाहीचा चौथा स्तंभ म्हणून पत्रकारितेची भूमिका अधोरेखित करत, पत्रकारांच्या न्याय्य मागण्यांसाठी सहकार्य राहील, असेही त्यांनी स्पष्ट केले. या भेटीमुळे पत्रकार संघाच्या मागण्यांना बळ मिळाले असून, येत्या काळात ठोस पावले उचलली जातील, अशी अपेक्षा व्यक्त करण्यात आली.

## कियाकडून ग्लोबल प्रीमियरमध्ये ऑल-न्यू सेल्टोस लाँच




**नवी दिल्ली : (समर्थ गांवकरी)**

मोठे आकारमान, सुधारित सुरक्षितता आणि अत्याधुनिक नाविन्यतेसह एसयूव्ही नेतृत्वाला अधिक प्रबळ करणारे लक्षवेधक उत्पादन वितरित करण्याप्रती आपल्या कटिबद्धतेशी बांधील राहत किया इंडियाने आज ऑल-न्यू किया सेल्टोसचे अनावरण केले, ज्यासह विभागामधील बेंचमार्क-सेटरचे पुनरागमन झाले आहे. भारतातील सर्वात लोकप्रिय एसयूव्ही सेल्टोसमध्ये आकर्षक नवीन स्टाइल, प्रीमियम इंटीरिअर्स, तसेच ग्राहकांच्या विविध गरजांची पूर्तता करणारे वैविध्यपूर्ण ट्रिम्स आणि पॉवरट्रेन्स आहेत. देशभरात बुकिंग्जना 11 डिसेंबर मध्यरात्रीपासून सुरूवात होईल, ज्यासह ग्राहक 25,000 रूपयांच्या सुरूवातीच्या रकमेसह त्यांच्या पसंतीची व आवडती एसयूव्ही रिझर्व्ह करू शकतील. या घोषणेबाबत मत व्यक्त करत किया इंडियाचे व्यवस्थापकीय संचालक व मुख्य कार्यकारी अधिकारी श्री. ग्वांगू ली म्हणाले, ऑल-न्यू सेल्टोस जनरेशन बदलापेक्षा अधिक असून त्यामधून श्रेणीला नव्या उंचीवर घेऊन जाण्यासाठी कियाचा उद्देश दिसून येतो.

# पकडलेल्या बिबट्यांची संख्या वाढली : तात्पुरत्या निवासाचा प्रश्न ऐरणीवर

### आमदार दातेंची प्रधान मुख्य वनरक्षकांकडे तोडगा काढण्याची मागणी

**पारनेर : (समर्थ गांवकरी)**

शनिवार दि. १३ डिसेंबर २०२५ पारनेर तालुक्यासह नगर तालुक्यात बिबट्यांचा वाढता संचार आणि त्यामुळे निर्माण झालेली भीती लक्षात घेता पारनेर–नगर विधानसभा मतदारसंघाचे आमदार काशिनाथ दाते यांनी या गंभीर प्रश्नावर सातत्याने आवाज उठविला आहे. आतापर्यंत पारनेर तालुक्यातून एकूण १४ बिबट्यांना वनविभागाने जेरबंद केले असून, नगर तालुक्यातील एक बिबट्यालाही सुरक्षित ठिकाणी ठेवण्यात आले आहे. मात्र पकडलेल्या बिबट्यांना कायमस्वरूपी कुठे सोडायचे याबाबत स्पष्ट मार्गदर्शक सूचना नसल्याने सध्या वडगाव सावताळ येथील वनपरिसरात त्यांची तात्पुरती व्यवस्था करण्यात आली आहे. पकडलेल्या बिबट्यांना वनविभागाकडून नियमित अन्नपुरवठा केला जात असला, तरी रोज नव्याने बिबट्यांना पकडले जात असल्याने उपलब्ध पिंजऱ्यांची संख्या अपुरी पडत आहे. परिणामी एकीकडे जेरबंद बिबट्यांच्या सुरक्षित निवासाची अडचण तर दुसरीकडे नव्याने बिबट्या आढळणाऱ्या गावांमध्ये पिंजरे पुरवण्याचे मोठे आव्हान वनविभागासमोर उभे राहिले आहे. माणिकडोह येथील बिबट्यांच्या निवासस्थानीही क्षमतेची मर्यादा पूर्ण झाल्याने तेथेही ह्या बिबट्यांना सोडण्यात अडचणी येत आहेत त्यामुळे मतदार संघातील ह्या बिबट्यांना वनतारा किंवा इतर पर्यायी ठिकाणी स्थलांतरित करण्याची गरज निर्माण झाली आहे.

या पार्श्वभूमीवर आमदार काशिनाथ दाते सरांनी नागपूर येथे महाराष्ट्र राज्याचे प्रधान मुख्य वनरक्षक (वन्यजीव) श्रीनिवास रेड्डी यांची प्रत्यक्ष भेट घेऊन सविस्तर निवेदन सादर केले. या निवेदनात नागरिकांच्या जीवित सुरक्षेचा प्रश्न, वनविभागाकडील पायाभूत सुविधांची कमतरता, तसेच बिबट्यांच्या सुरक्षित पुनर्वसनासाठी तातडीच्या उपाययोजनांची गरज स्पष्टपणे मांडण्यात आली. यावेळी जिल्हा बँकेचे संचालक प्रशांत गायकवाड, जिल्हा परिषदेचे माजी सदस्य वसंत चेडे यांच्यासह अन्य मान्यवर उपस्थित होते.



पकडलेल्या बिबट्यांची संख्या १४ आहे, प्रत्येक गावात पिंजऱ्यांची मागणी होत आहे, पिंपरी मध्ये एकाच गावात ५ बिबटे जेरबंद केले तर किन्हीला ४ बिबटे जेरबंद झाले यावरुन बिबट्यांची संख्या खूप वाढलेली आहे, पिंजऱ्यांची संख्या वाढवावी, बिबट्यांचा धोका लक्षात घेऊन सरकारने तातडीने निर्णय घ्यावा,

**- आ. काशिनाथ दाते सर**
**(विधानसभा सदस्य)**

निवेदनाची गंभीर दखल घेत प्रधान सचिव श्रीनिवास रेड्डी यांनी या प्रश्नावर लवकरात लवकर योग्य तोडगा काढण्यात येईल, असा सकारात्मक शब्द दिला आहे. आमदार दाते यांच्या या पुढाकारामुळे बिबट्यांच्या सुरक्षिततेबरोबरच पारनेर-नगर विधानसभा मतदारसंघातील नागरिकांच्या जीवित सुरक्षेसाठी ठोस आणि परिणामकारक उपाययोजना होण्याची आशा निर्माण झाली आहे.